

Late Dr. Bhau Mandavkar



ISSN 2349-9370
Vol. 3 Issue 2
Oct. 2016
Regular Issue

Impact Factor
2016 – 4.43
www.sjifactor.com

# Research Journal of India

(Peer Reviewed Multi-Disciplinary Annual National Research Journal)



Dr. Bhau Mandavkar Research Centre
INDIRA MAHAVIDYALAYA
KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445401 (India)

Impact Factor 2016 – 4.43 ISSN 2349-9370

# RESEARCH JOURNAL OF INDIA

Peer Reviewed Annual National Research Journal for Multi-Disciplinary Studies

Volume 3 Issue 2
October 2016
Regular Supplement Issue

**Chief Editor**
**Dr. Pavan Mandavkar**
Principal, Indira Mahavidyalaya
Chairman, Research Centre

**Associate Editor**
**Dr. Veera Mandavkar**
Director, Research Centre
Indira Mahavidyalaya, Kalamb

**---- Editorial Board ----**

**Dr. Martand Khupse**
**Prof. N.R. Thawale**
**Dr. G.P. Urkunde**
**Prof. S.Y. Lakhadive**
**Prof. A.G. Dondal**
**Prof. D.S. Patil**
**Prof. R.T. Ade**
**Dr. B.V. Rothod**
**Prof. R.M. Wath**
**Prof. N.V. Narule**
**Prof. M.P. Rakhunde**

## Invited Guest Editors

1. **Vikram Raje,** 4, Alderman Willey Close, Wokingham – RG41 2AQ, Berkshire, UK
2. **Vishal Dahalkar,** 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
3. **Dr. Anita Gupte Patil,** Auckland, New Zealand
4. **Ranjit Raje,** 201/83 Whiteman Street, Southbank, Melbourne, VIC-3006, Australia

## Advisory Board

**Sonali Dahalkar,** 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
**Prof. Dineshkumar Joshi,** Ex. Registrar, S.G.B. Amravati University, Amravati
**Dr. Santoh Thakre,** Ex. Dean, Faculty of Social Science, S.G.B. Amravati Uni., Amravati
**Dr. P.W. Kale,** Ex. Dean, Faculty of Commerce, S.G..B. Amravati University, Amravati
**Dr. R.A. Mishra,** Principal, Amolakchand Mahavidyalaya, Yavatmal
**Dr. U.V. Navalekar,** Principal, Abasaheb Parvekar Mahvidyalaya, Yavatmal
**Dr. J.M. Chatur,** Principal, Smt. Nankibai Wadhwani Kala Mahavidyalaya, Yavatmal
**Dr. Anil Gajbhiye,** Ex. Principal, Govt. college Sardarpur, Dist. Dhar, M.P.
**Dr. Shashikant Sawant,** Ex. H.O.D., Marathi, Vikram Vishwavidyalaya, Ujjain, M.P.

**Publisher : Dr. Mrs. Veera Mandavkar,** Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401(India)
E mail – **researchjournalofindia@gmail.com** Alternate mail id – **marathipradhyapak@gmail.com**
Telephone: 07201-226147, 226129 Telefax, Mob. Chief Editor: 9422867658 Director 9403014885
Website: **www.indiramahavidyalaya.com** **www.researchjournal.net.in**

**Printer: Seva Prakashan,** Vijay Colony, Rukmini Nagar, Amravati, Maharashtra 444 606
**Cover Page Design & Computer Work : Dr. Pavan Mandavkar**

**Subscription for hard copy for one year Rs. 500/-**

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| | Guidelines for Authors | Editorial Board | 3 |
| | From the Bench of Editor | Dr. Pavan Mandavkar | 4 |
| 1 | महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पात महिलांविषयक तरतुदी व योजना : एक दृष्टिक्षेप | प्रा. श्रीमती आर.एम. वाठ | 5 |
| 2 | स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक परिवर्तनाची दिशा आणि आव्हाने | डॉ. बी.व्ही. राठोड | 8 |
| 3 | जंगलांचा विनाश आणि हवामानबदल : एक अभ्यास | प्रा. एन. व्ही. नरुले | 11 |
| 4 | विद्यार्थ्याची सर्वांगीण सुरक्षितता पालक व शिक्षकाची जबाबदारी | प्रा. सरोज यादवराव लखदिवे | 13 |
| 5 | महानुभावीय मराठी वाङ्मय : एक अभ्यास | प्रा. डॉ. गजानन हेरोळे | 16 |
| 6 | संत तुकारामांचा आत्म साक्षात्कार | प्रा. डॉ. हरिदास आखरे | 19 |
| 7 | सामाजिक शास्त्र संशोधनात शैक्षणिक ग्रंथालयाची भूमिका | डॉ. जी.पी. उरकुंदे | 23 |
| 8 | स्वयंसहाय्यता बचत गटांना बाजारपेठ उपलब्धता | प्रा. माधुरी पंडीतराव राखुंडे | 26 |
| 9 | स्त्रीजाणिवेचा हुंकार : कमल देसाई आणि विजया राजाध्यक्ष | प्रा. डॉ.सौ. वीरा मांडवकर | 29 |
| 10 | प्रादेशिक कांदबरीची काही वैशिष्ट्ये | प्रा. अतुलकुमार सारडे | 34 |
| 11 | मानसिक स्वास्थ, वेळेचा सदुपयोग व व्यक्तिगत प्रगती | प्रा.कु. एम.एम. जगताप | 37 |
| 12 | A.K. RAMANUAJ - A POET OF INDIAN SENSIBILITY | Mr. Dipak. D. Ghodekar | 40 |
| 13 | DRUG VIOLENCE AND DRUG OBSESSION | Dr. R.M. Kadam | 44 |
| 14 | स्वातंत्र्योत्तर साठपूर्व वैदर्भीय कादंबरीतील सामाजिक जाणिवा | डॉ. पवन मांडवकर | 50 |
| 15 | FACTORS ASSOCIATED WITH CHILD OBESIOTY AND EMERGING CONSEQENCE – A MATTER OF SERIOUS CONECERN | Sau. Kalpana Korde | 54 |
| 16 | घन कचऱ्याचे व्यवस्थापन एक समस्या : घाटंजी शहर अभ्यास | प्रा. कविता आर. किर्दक | 59 |

# Guidelines for Authors

Research Journal of India is a Peer Reviewed Annual National Research Journal for Multi-disciplinary studies of various faculties.

Vision and Mission of Research Journal is to provide momentum to research in the all areas like analytical, competitive, survey, contemporary issues and quality control.

**Call for Research Paper**

1. Paper on all subjects and areas will be accepted in English, Hindi or Marathi.
2. Paper should be **A 4** size with 1.25 inch margin on each side.
3. No header & footer should be given.
4. Text should be in **Times New Roman** type with font size **11** in English and **Krutidev 50** type with **14** font size for Hindi/Marathi and should be computed in MS word only. PDF files will not be accepted.
5. Font size for Title of Paper 22 bold for English and 26 bold for Hindi/Marathi, Name of Author in 12 bold for English, 16 bold for Hindi/Marathi, address in 11 for English, 14 bold for Hindi/Marathi & Subtitles in 14 bold for English and 18 bold for Hindi/Marathi. For Marathi and Hindi articles Krutidev 50 font should be tatally bold for all matter.
6. Spacing should be **single**. Alignment for paper & headings should be justified & centered for title of paper & name of writer with address.
7. The first page should consist of title, name(s) of author(s) with designation, department or college with full address, contact numbers and mail id at the centre below title.
8. Introduction, review of literature, background of study, methodology, objectives, purpose, hypothesis, significance, findings and discussion, analysis, conclusion, recommendations may be given wherever required.
9. References list should be alphabetized at the end of research paper.
10. Tables & figures should be cited in the text in consecutive numerical order. Each figure should have concise and informative caption.
11. Maximum limit is 2500 words or 5 pages. Abstract should be up to 150 words followed by 4-5 key words. Paper exceeding 5 pages will be charged Rs. 100 per additional page. Only abstract or paper less than 3 pages or without references will not be accepted.
12. Authors have to send research paper by e mail at: **marathipradhyapak@gmail.com**
11. Editorial Board's Decision will be final.
13. The copyright of all accepted papers will vest with **Research Journal of India.**
14. International Guidelines for writing of research paper are to be strictly followed.
15. Date of Publishing is 1rst October each year and papers will be accepted up to 15th August.
16. Fees to publish research paper for a single author is Rs. 700/- & Rs. 900/- for more than one author to be deposited in A/c No. – 60175373000 of Bank of Maharashtra, Azad Maidan Road, Yavatmal, IFSC code - MAHB0000047 in favour of **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre.**

❖❖❖

**Subscription for one year and single issue price for individual, institutional Rs. 500/**

(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)

# From the Bench of Editor

The renowned scientist Mr. Ramesh Raskar, founder of the Camera Culture research group at the MIT Media Lab and associate professor of media arts and sciences at MIT, is the recipient of the 2016 $500,000 Lemelson-MIT Prize. Mr. Raskar is the co-inventor of radical imaging solutions including femtophotography, an ultra-fast imaging system that can see around corners; low-cost eye-care solutions for the developing world; and a camera that allows users to read pages of a book without opening the cover. Mr. Raskar seeks to catalyze change on a massive scale by launching platforms that empower inventors to create solutions to improve lives globally.

Mr. Raskar has dedicated his career to linking the best of the academic and entrepreneurial worlds with young engineers, igniting a passion for impact inventing. He is a pioneer in the fields of imaging, computer vision and machine learning and his novel imaging platforms offer an understanding of the world that far exceeds human ability.

In 2012, Raskar co-created femtophotography, an advanced form of photography allowing cameras to see around corners. The technology, currently in development for commercialization, uses ultrafast imaging to capture light at 1 trillion frames per second, allowing the camera to create slow motion videos of light in motion. Raskar and his team have received significant funding from sponsors including the U.S. Defense Advanced Research Projects Agency (DARPA), the National Science Foundation, and MIT to further develop the idea of using "scattered light imaging" to see around corners.

Potential future applications include: avoiding car collisions at blind spots; detecting survivors in fire and rescue situations; and performing endoscopy and medical imaging to eliminate the need of an X-ray. Raskar is continuing this research to make the seemingly impossible possible — from reading a book without opening the cover to capturing images of out-of-sight objects using sound waves.

Raskar is the co-founder of EyeNetra, an inexpensive, disruptive eye-care platform that spun out of Media Lab research. EyeNetra enables on-demand eye testing in remote locations via a hand-held technology that snaps onto a mobile device. When looking into the binocular the user is provided with interactive cues to rapidly calculate a prescription for eyeglasses. The technology was created to eliminate the need for expensive diagnostic tools in the developing world; the young company has performed eye-tests for hundreds of thousands of subjects and is currently active in the U.S., Brazil, and India.

Mr. Raskar's team has also worked on many areas of preventable blindness, low vision, and diagnostics at MIT. In 2013, he and his colleagues launched LVP-MITRA in Hyderabad, India, a center where hundreds of young inventors have been co-inventing next generation screening, diagnostic, and therapeutic tools for eye-care.

Mr. Raskar is also the founder of the Emerging Worlds initiative, a year-round effort focused on solving some of the world's most pressing problems and impacting billions worldwide. This initiative links corporate members, government organizations, educational institutes, and venture partners. This methodology was recently used at the Kumbhathon sandbox for innovations at Kumbh Mela, a gathering of 30 million people, and at the Digital Impact Square, a multi-million-dollar living lab and open co-innovation center. Raskar has mentored several teams that span crowd-steering via use of cell tower data to display heat maps of crowd movements, stations to test vital statistics using portable instruments, and an analytics-based system to detect impending epidemic outbreaks in real-time.

This issue of **'Research Journal of India'** is a salute to Professor Ramesh Raskar.

- **Dr. Pavan Mandavkar & Board of Editors**

❖❖❖

# महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पात महिलांविषयक तरतुदी व योजना : एक दृष्टिक्षेप

प्रा. श्रीमती आर.एम. वाठ
वाणिज्य अधिव्याख्याता
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

## प्रस्तावना

देशाच्या विकासात स्त्रियांचे महत्त्व अतिशय जास्त आहे. स्त्रियांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेत लिंगावर आधारित बजेट ही संकल्पना पुढे आली. याद्वारे शासकीय विविध योजनांचा लाभ राष्ट्रात, राज्यात, समाजात आणि ग्रामीण भागातील स्त्रियांपर्यंत पोचावा आणि पुरुष व स्त्रियांची विषमतेचे असंतुलन दूर करता यावे यासाठी मुख्य बजेट मध्येच लिंगावर आधारित बजेटचे समायोजन करून बजेट प्रस्तुत करण्यात आले. सध्या भारतात कल्याणाची जागा सशक्तीकरणांनी घेतली असून लिंगावर आधारित बजेट वितरीत केले आहे. सर्वप्रथम लिंगावर आधारित बजेटची संकल्पना ऑस्ट्रेलियात १९८४ मध्ये मांडली. १९८९ मध्य ब्रिटीश वुमन बजेट ग्रुप या संघटनेचा वैचारिक दबावातून इंग्लंडमध्ये लिंगाधिरीत मूल्यमापनाची सुरुवात करण्यात आली. १९९३ मध्ये कॅनडा या देशात तर १९९५ मध्ये दक्षिण आफ्रिका या देशात लिंगावर आधारीत बजेट मांडल्या गेला. सध्या जगातील ७० देशात लिंग आधारित बजेटचा उपयोग केला जात आहे.

लिंगावर आधारित बजेट म्हणजे स्त्रियांकरिता वेगळे बजेट निर्माण करणे नसून मुख्य बजेटमध्येच समायोजन करून सामाजिक आणि लैंगिक विषमता दूर करणे होय. स्त्री भ्रुणहत्या समाज व्यवस्थेत स्त्रीला न मिळणारे फायदे त्यांचे शोषण, त्यांच्यावर होणारे अन्याय स्त्रियांचे अधिकार, साक्षरता इ. सर्व आकडेवारींचे अवलोकन करून महिलांना सशक्त करण्यासाठी त्यांना शिक्षण अधिकार वित्तीय सहायता आणि स्वयंनिर्भरतेची गरज आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करता आज लिंग आधारित बजेटची संकल्पना पुढे आलेली आहे. या सरकारी योजनेचा लाभ हा समाजातील प्रत्येक स्त्रीला मिळाला पाहिजे अशी राष्ट्र आणि राज्य यांचे प्रयत्न सुरू आहे.

## महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प

## २०१३–१४ अर्थसंकल्पातील महिला विषयक तरतुदी

सन २०१३–१४ च्या अर्थसंकल्पात महाराष्ट्र शासनाने महिला आणि लहान मुलांच्या आरोग्याची आणि सुरक्षिततेची विशेष दक्षता घेतली आहे. त्या योजना खालील प्रमाणे –

१. पोषण आहार कार्यक्रम – सन २०१३–१४ मध्ये १२९४ कोटी ७६ लाख रूपये गरोदर स्त्रिया, स्तनदा माता व ० ते ६ वयोगटातील मुलांमुलींच्या एकात्मीक बाल विकास योजनेअंतर्गत पोषण आहार कार्यक्रम राबविण्यात आला होता.

२. राजीव गांधी सबला योजना – या योजनेत २०१३–१४ साली केंद्र व राज्य शासनाचा ५०–५० टक्के वाटा होता. या योजनेचे बजेट ११० कोटी ७८ लाख रूप्ये अपेक्षित होते. महाराष्ट्र राज्यात बीड, नांदेड, मुंबई, नाशिक, गडचिरोली, बुलडाण, कोल्हापूर, सातारा, अमरावती, नागपूर आणि गोंदिया या जिल्हयातील २०७ प्रकल्पात वर्षे ११ ते १८ या वयोगटातील किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणासाठी राजीव गांधी सबल योजना सुरू करण्यात आली होती.

३. मुलींची वसतीगृहे– सन २०१३–१४ मध्ये १०० कोटी रूपये या योजनेसाठी होते यासाठी केंद्र शासनाचा ९० टक्के व राज्य शासनाचा १० टक्के हिस्सा होता. एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटूंब शिकते. स्त्रीयांचे समाजातील मागासलेपणा दूर करायचे असेल तर त्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे. आजही आपल्याकडे शैक्षणिक गळतीमध्ये मुलींचे प्रमाण जास्त आहे. ते कमी करायचे असेल तर त्यांना शैक्षणिक सुविधा देणे त्यांना सुरक्षिततेच्या दृष्टिने वसतीगृहे बांधण्याची योजना होती.

अर्थ संकल्पातील महिला विषयक तरतुदी २०१४–२०१५

१. महिला बालसुरक्षेसाठी १०५ समुपदेशन केंद्र स्थापणार.
२. स्त्रीभ्रृणहत्या रोखण्यासाठी सुकन्या योजना.
३. मुलींसाठी सुकन्या योजना
४. लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी १५ कोटी १० लाख ची तरतूद.
५. अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ.
६. अंगणवाडी सेविकांना निवृत्तीनंतर १ लाख रू.
७. ठेवी बुडालेल्या उपवर मुलींच्या पालकांना एक लाखाची मदत.

## २०१५—२०१६ अर्थसंकल्पातील महिला विषयक तरतुदी

१. व्यवसाय कर — मासिक रुपये सात हजार पाचशे पेक्षा जास्त वेतन असणाऱ्या सर्व महिलांना व्यवसाय कर भरावा लागायचा. त्याची मर्यादा वाढवून दहा हजार रुपये करण्यात आली होती. दहा हजार रुपये पर्यंत मासिक वेतन असणाऱ्या महिलांना यापुढे व्यवसाय कर लागणार नाही. याचा जवळपास एक लाख पन्नास हजार नोकरदार महिलांना लाभ होईल असा अंदाज होता.

२. महिलांच्या पर्सेस व हॅण्डबॅग्ज वरील मूल्यवर्धित कराचा दर साडेबारा टक्क्यावरून पाच टक्के करण्यात आला.

३. मुलींसाठी वसतिगृह—माध्यमिक शाळेत दाखल होणाऱ्या मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करण्याकरिता २०१४—१५ च्या आर्थिक बजेट पेक्षा दुप्पट म्हणजे ११२ कोटी ५२ लाख रू इतकी तरतूद मुलींच्या वसतीगृह बांधण्याची योजना होती.

४. मुलींच्या शासकीय वसतिगृहांना संरक्षक भिंत बांधणी. महाराष्ट्रातील सर्व मुलींच्या शासकीय वसतिगृहांना टप्याटप्यांनी संरक्षक भिंत बांधण्याचे शासनाने नियोजन असून सन २०१५—१६ मध्ये नियोजन विभागअंतर्गत अतिरिक्त नियम व्ययापैकी २५ पैकी रुपये आहे. येत्या तीन वर्षात राज्यातील सर्व वसतिगृहांना संरक्षक भिंती बांधण्याचा शासनाचा निर्धार आहे.

५. महिला बचत गटांचे सक्षमीकरण नारी शक्तीचा सन्मान व आदर करत महिलांचे सक्षमीकरण व त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी विविध योजना व या योजना राबविण्यात महिला वर्गास सूक्ष्म वित्तपुरवठा करण्याची शासनाचा मनोदय आहे.

६. पोषण आहार — पोषण आहारासाठी स्थानिक कृषी उत्पादनाच्या माध्यमातून चांगले तसेच दर्जेदार पोषण आहार उपलब्ध करून देण्याचा शासनाचा मानस आहे. हा पोषक आहार महिला बचत गटाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यासाठी त्यांना यंत्रसामग्री खरेदीसाठी मदत करण्यात येईल. तसेच महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंच्या विक्रीसाठी जिल्हास्तरावर कायमस्वरूपी ‘पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बाजारपेठ’ निर्माण करण्याचा शासनाचा मानस आहे. यासाठी नियोजन विभागांतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी २०० कोटी रुपये नियत व्यय चिन्हांकित केला आहे.

७. अंगणवाडी सेविकांचे मानधन — अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मानधनात केलेली वाढ दि. १ एप्रिल २०१५ पासुन लागू करण्यात येईल.

८. माझी कन्या भाग्यश्री — केंद्र सरकारच्या ‘बेटी बचाओ बेटी पढाओ’ या योजनेच्या धर्तीवर ‘माझी कन्या भाग्यश्री’ या नावाने नवीन योजना राज्यात सुरू करण्यात येत आहे. यासाठी सन २०१५—१६ मध्ये नियोजन विभागाअंतर्गत अवितरित नियतव्ययांपैकी २०० कोटी रूपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

## २०१६—१७ अर्थसंकल्पातील महिला विषयक तरतुदी

१. मुलीच्या वसतीगृहासाठी ५० कोटी रुपये इतका नियतव्यय आहे.

२. राज्यातील मुलींसाठी दि.१ एप्रिल २०१६ पासून ‘माझी कन्या भाग्यश्री योजना राबविण्यात येणार असून त्यासाठी २५ कोटी रूपये इतका नियतव्यय आहे.

३. आदर्श अंगणवाडी कार्यक्रमांतर्गत १० हजार अंगणवाडया आदर्श करण्यासाठी १०० कोटी रुपये नियतव्यय आहे.

४. महिलांसाठी स्वतंत्र ‘तेजस्विनी बस’

५. राज्य महामार्गावर महिलांसाठी स्वच्छतागृहे.

६. अंगणवाडी सेविका व मदतनिसांना विमा संरक्षण.
७. महिला बचत गटांना शून्य टक्के व्याजाने कर्ज
८. 'माझी कन्या भाग्यश्री योजना'
९. ब्रेस्ट कॅन्सरच्या पडताळणीसाठी वापरण्यात येत असलेल्या मॅमोग्राफी यंत्र करमाफ.
१०. कै. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत व महिला सक्षमीकरण अभियान.

## सारांश

महिला सक्षमीकरणाकरिता वरीलप्रमाणे विविध प्रकारच्या तरतुदी अणि योजना महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सुरक्षिततेकरिता तयार करण्यात आल्या. वास्तविक परिस्थिती अशी आहे की, या योजना ज्या महिलांसाठी तयार करण्यात आल्या, त्या महिलांपर्यंत पोचतच नाही प्रत्येक अर्थसंकल्पात मुलींच्या वसतिगृहाच्या तरतुदी आहेत. पण अजुनही काही शासकीय वसतीगृह आहे त्या परिस्थितीच आहे. अंगणवाडीच्या सेविका व मदतनीसांठी योजना आहेत. 'माझी कन्या भाग्यश्री' योजना मुलींसाठी आहेत. या योजना महिला आणि मुलींपर्यंत पोहचल्या पाहिजे तसेच महिलांना त्यांच्या हक्काची आणि अधिकाराची अजूनपर्यंत पूर्णपणे जाणीव झालेली नसल्याचे दिसून येते. अनेक अहवालावरून महिला हया आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या असल्यातरी मानसीकदृष्टया त्या दबावात असल्याचे दिसून येते. जोपर्यंत महिला स्वत:हून मानसीक गुलामगिरीतून मुक्त होणार नाही, स्वत:वर निर्भर राहणार नाही, तोपर्यंत सरकारने कितीही योजना आखल्या तरी सर्वार्थाने महिलांचे सक्षमीकरण होणार नाही. महिलांना स्वत:चे सहकार्य आणि निर्धार अत्यंत महत्त्वाचे आहे.

## निष्कर्ष

१. जास्तीत जास्त महिला व मुलींनी शिक्षण घेतले पाहिजे.
२. महिलांना अर्थसंकल्पातील तरतुदींची माहिती असली पाहिजे.
३. ज्या महिलासांठी या योजना तयार करण्यात येतात त्या त्यांच्या पर्यंत पोहचल्या पाहिजे व त्याचा फायदा त्यांना झाला पाहिजे.
४. समाजात महिलांना त्यांच्या हक्काची व अधिकाराची जाणीव करून देण्याची गरज आहे.
५. महिलांनी मानसिक गुलामगिरीतून मुक्त होवून आत्मनिर्भर व्हायला पाहिजे.

## संदर्भ

1. www.maharastra gov.in/budget-2013-14
2. www.maharashtra gov.in/Budget-2014-15
3. www.maharashtra gov.in/Budget-2015-16
4. www.maharashtra gov.in/Budget-2016-17

❖❖❖

# स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक परिवर्तनाची दिशा आणि आव्हाने

डॉ. बी.व्ही. राठोड
सहयोगी प्राध्यापक तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ
Email-baliramrathod42@gmail.com

## प्रस्तावना

ब्रिटीशांच्या सत्तेपासून भारताला मुक्त करण्यासाठी भारतीयांनी मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्य चळवळ उभी केली; परंतु ती केवळ परकीय आक्रमणापासून भारताला मुक्त करण्याची चळवळ नव्हती तर ती एक नवसमाज निर्मितीची चळवळ होती. टिळकानंतर महात्मा गांधींच्या नेतृत्वात स्वातंत्र्याची चळवळ अत्यंत व्यापक बनली. गांधीजींनी अनेक प्रकारची आंदोलने केली. या चळवळीत भारतातील सर्व प्रदेशांमधील व समाजाच्या सर्व स्तरांमधील लोकांचा सहभाग होता. १८८५ मधील भारतीय राष्ट्रीय कॉंगेसच्या स्थापनेपासून तर १९४७ पर्यत स्वातंत्र्याची चळवळ उत्तरोत्तर व्यापक होत गेली.

स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या स्वातंत्र्योत्तर भारताचे स्वप्न पाहिले गेले त्याची नेमकी दिशा राबविण्याचे कार्य भारतीय राज्यघटनेने केले. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांवर आधारित भारत निर्माण करावयाचा आहे असे निश्चित झाले. त्याचबरोबर लोकशाही, धर्मनिरपेक्षता व समाजवाद या मूल्यांवरही भर दिला गेला. या प्रकारे समताधिष्ठित व न्यायावर आधारित असा एकसंघ भारत निर्माण करण्याची दिशा ठरविली गेली व त्या दृष्टीने करावयाच्या प्रयत्नांवर घटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार व घटनेच्या विविध कलमानुसार भर देण्यात आला.

## संशोधनाचे उद्देश

१. स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक परिवर्तनाची दिशा जाणून घेणे.
२. सामाजिक परिवर्तन प्रक्रियेतील आव्हानांचे विश्लेषण करणे.

## संशोधन पद्धती

या शोधनिबंधासाठी मासिके, इंटरनेटर, विषयाला अनुसरून असणारे पुस्तके व इतर संदर्भ ग्रंथाचा आधार देण्यात आला.

## स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक परिवर्तनाची दिशा

१९५० मध्ये भारत प्रजासत्ताक झाला त्यावेळी भावी भारतीय समाजाची दिशा निश्चित होती. पंचवार्षिक योजना, पंचायत राज कायदा, या आधारावर भारताच्या व भारतातील ग्रामीण समाजाचा विकास अपेक्षित होता.

१. भारतीय समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी शासनानी ठरविलेल्या, विविध विकास योजना, वैधानिक तरतुदी व कायदे यांचा समावेश करता येईल. त्याचप्रमाणे विविध बिगर शासकीय व सामाजिक संघटनाकडून केले गेलेले प्रयत्न यांचाही समावेश करता येईल. स्वयंसेवी संघटनांचे विकास प्रकल्प, लोकजागृती चळवळी, स्त्रीमुक्ती चळवळ, पर्यावरणवादी चळवळ या व अशा अनेक चळवळीतून समाज परिवर्तन करणे.

२. भारतीय समाजावर त्याच्या भोवतालच्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाचा पडणारा प्रभाव व त्यातून निर्माण होणारे परिवर्तन जसे पाश्चिमात्य विचारांचा प्रभाव, तंत्रज्ञानाचा प्रभाव, जागतिकरणाची संकल्पना, गॅट करार इत्यादी स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने आजतागायत अनेक गोष्टी साध्य केल्या आहेत.

३. औद्योगिक क्षेत्रात भारत देशान बरीच प्रगती केली आहे. उसनवारीपेक्षा किंवा इतर देशांवर अवलंबून न राहता स्वत: विकसित केलेल्या तंत्राचा व यंत्राचा वापर केला जात आहे. भारताजवळ विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील

मनुष्यबळ आहे. अवकाश क्षेत्र, क्षेपणास्त्र निर्मिती, संगणक व सॉफ्टवेअर या क्षेत्रामध्ये भारताने मोठी झेप घेतली आहे.

४. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या एक दोन दशकामध्ये अन्नधान्याची टंचाई असणाऱ्या भारताने आज अन्नधान्य उत्पादनात फार मोठी प्रगती केली आहे. भारता जवळ दोन वर्षे पुरेल एवढा धान्याचा साठा उपलब्ध आहे.

## स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजातील आव्हाने

१. मानव विकासाच्या बाबतीत भारताची स्थिती समाधानकारक नाही. सन २०१५ च्या मानवविकास अहवालानुसार विकासाची जी क्रमवारी ठरलेली आहे त्यात क्रमवारी दिलेल्या १८५ देशांमध्ये भारताचा क्रमांक १३० वा आहे. शेजारी राष्ट्राचा विचार केला तर पाकिस्तानचा क्रमांक १४७, बांगलादेशाचा क्रमाक १४२, चीनचा क्रमांक ९० तर श्रीलंका ७३ क्रमांकावर आहे. अनेक विकसनशील देश भारताच्या पुढे आहे. भारताचा मानव विकास सुचकांक पाहिला तर ०.६०९ आहे. तर पाकिस्तान ०.५३८, बांगलादेश ०.५७०, चीन ०.७२७ व श्रीलंका ०.७५७ असा आहे.

२. दारिद्र्याची संकल्पना मांडून विकासाचे अंतिम उदिष्ट निर्मुलन हे मानले आहे; परंतु विश्व अधिकोष (जागतिक बॅंक), विभिन्न आंतरराष्ट्रीय संस्था, भारतीय योजना आयोग यांनी केलेल्या मापनाचे चित्र पाहिले असता दारिद्र्य निर्मूलन हे एक आव्हानच आहे. जगातील पहिल्या १५ दरिद्री देशांमध्ये भारताचा समावेश आहे. जागतिक बॅंकेने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार प्रति व्यक्ती व प्रति दिवस १.२५ डॉलर म्हणजे सुमारे ६२ रुपयापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांची संख्या भारतात ४५.६ कोटी आहे. भारतीय योजना आयोगाने २००४–०५ मध्ये केलेल्या पाहणीनुसार सुमारे २७ टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत होते. भारत सरकारने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार २००७ मध्ये २२.०१ कोटी लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत होते. अर्थशास्त्राच्या सभासदांनी केलेल्या पाहणीनुसार दारिद्र्यरेषेच्या खाली २६.०३ कोटी लोक जीवन जगत असून त्यापैकी १९.३२ कोटी लोक शहरी भागात आढळल्याचे दिसते.

३. शिक्षण क्षेत्रात भारत आजही मागे आहे. सर्वांना शिक्षण पुरवण्याच्या ध्येयामध्ये भारत ५० वर्षे मागे असल्याचा अहवाल संयुक्त राष्ट्राने दिला आहे. प्राथमिक शिक्षणाचे ध्येय २०५० मध्ये, कनिष्ठ माध्यमिक शिक्षणाचे ध्येय २०६० मध्ये आणि उच्च माध्यमिक शिक्षणाचे ध्येय २०८५ मध्ये पूर्ण करेल असे अहवालात नमुद करण्यात आले आहे.

भारताला शाश्वत विकासाचे ध्येय गाठायचे असेल तर शिक्षण क्षेत्रात मूलभूत बदल करण्याची गरज आहे तेव्हाच २०३० पर्यंत हे ध्येय पूर्ण होऊ शकेल असे ग्लोबल एज्युकेशन मॉनिटरींग (जीईएम) च्या अहवालात सांगण्यात आले आहे. भारतात ६ कोटीपेक्षा जास्त मुलांना कमी किंवा अजिबात शिक्षण मिळत नाही. तर ११ लाख मुले माध्यमिक स्तरावर असताना शिक्षण सोडून देतात. उच्च माध्यमिक स्तरावरील ४ कोटी ६८ लाख मुले शाळेतच जात नाहीत तर २९ लाख मुले प्राथमिक शिक्षणापासून दूर आहेत.

४. देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास वेगाने होत असला तरी रोजगारांची वानवा आहे. गेल्या दोन वर्षापासून भारत जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था मानली जात आहे. परंतु त्या तुलनेत रोजगाराच्या संख्येत मात्र वाढ झालेली नाही. विशेष म्हणजे सामान्यांच्या मिळकतीत वाढ झालेली नसल्याने अर्थव्यवस्थेचा वेग कुणासाठी? असा प्रश्न निर्माण झाला आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आगामी १० वर्षात २५० दशलक्ष नोकऱ्या निर्माण करण्याचे महत्वाकांक्षी उदिष्ट सध्यातरी दृष्टीपथात दिसत नाही. कारण एका नोकरीसाठी २० लोक मुलाखत देण्यासाठी येतात. बीएसई आणि सेंटर फॉर मिनिटरिंग इकॉनॉमी (सीएमआई) यांनी संयुक्तरित्या जारी केलेल्या आकडेवारीनुसार ऑगस्ट २०१६ मध्ये शहरी भागातील बेरोजगारी वाढून ११.२४ टक्क्यांवर गेली आहे. ग्रामीण भागातील बरोजगारीचे प्रमाण ९.१८ टक्के आहे. राष्ट्रीय पातळीवर बेरोजगारीचे प्रमाण ९.८४ टक्के आहे.

५. १९६४ मध्ये भारत सरकारने भ्रष्टाचाऱ्या समस्यांचे अध्ययन करून त्याचे निर्मूलनार्थ उपाययोजना सुचविण्यासाठी संथानम यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली होती. या समितीने भ्रष्टाचाराची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. ''एखादया शासकीय पदाच्या किंवा सार्वजनिक जीवनातील महत्वपूर्ण व प्रभावी पदाचा आणि सत्तेचा दुरूपयोग किंवा स्वार्थ साधण्याच्या हेतूसाठी करण्यात येणारा वापर म्हणजे भ्रष्टाचार होय.'' अशी व्याख्या केली असली तरी 'ट्रान्सफरन्सी इंटरनॅशनलच्या २०१५' च्या अहवालानुसार जागतिक भ्रष्टाचार निर्देशांकाच्या यादीत भारत ७६ व्या क्रमांकावर असून थायलंड, ब्राझील हे देशसुध्दा याच क्रमांकावर आहे.

६. नैतिक मूल्यांची वाढती घसरण ही सुद्धा एक चिंतेची बाब आहे. वाढता भ्रष्टाचार, पैशाला अतिरेकी महत्त्व, चंगळवाद, व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली केवळ आपल्यापुरते पाहण्याची वृत्ती यामुळे समाजविकासाला अडथळे येत आहे.

७. लोकशाही समाजात राजकीय जीवनामध्ये लोकांचा वाढता सहभाग आवश्यक आहे. मतपेटीद्वारे आपले मत मांडून सरकार बदलविण्याचा अधिकार लोकांना आहे. असे असले तरी भारतात राजकीय पक्ष ज्या प्रकारे वर्तन करीत आहे व भारतात जी राजकीय संस्कृती विकसीत होत आहे, ती चिंता करण्यासारखी आहे.

८. भारतात अलीकडच्या काळात लोकांचे शासनावरील वाढते अवलंबन व शासनानीच सर्वकाही करावे ही विकसीत होत असलेली प्रवत्ती. कोणत्याही देशाचा विकास हा त्या देशातील लोकांच्या प्रयत्नांवर, कष्टांवर अवलंबून असतो. भारताला एक शक्तीशाली व प्रभावी राष्ट्र म्हणून दर्जा प्राप्त करावयाचा असेल तर लोकांच्या वर्तनात तसे अनुकूल बदल झाले पाहिजे. परंतु आपल्या हितसंबंधासाठी राजकीय पक्ष लोकांचे शासनावरील अवलंबन दिवसेंदिवस वाढवीत असतील तर ते लोकांना स्वावलंबी कसे बनू देणार? ही प्रवृत्ती विनाशाकडे नेणारी आहे. या प्रक्रियेत देशातील दुर्बल घटकाला हे साध्य करता येत नाही. त्यांना योग्य न्याय मिळत नाही. जे बलदंड आहेत तेच शासनाच्या योजनेचा फायदा घेतात. या आव्हानांचा विचार होणे गरजेचे आहे.

प्रगत भारताचे स्वप्न स्वातंत्र्यपूर्व काळापासून अनेकांनी पहिले व अजूनही तसे स्वप्न पाहणे चालूच आहे. भारताचे माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी सांगितल्याप्रमाणे २०२० मध्ये भारत एक आर्थिक महासत्ता बनू शकेल, त्यापुढेही जावून कलाम म्हणतात, ''नागरिकांच्या विचारांवरच राष्ट्राची प्रगती अवलंबून असते, कारण विचारांचे कृतीत रूपांतर होत असते. म्हणून या देशातील तरूणांची मते भरभराटीच्या विचारांनी बहरू द्या'' तरच खऱ्या अर्थाने मानव विकास साधेल व समाज परिवर्तनाला योग्य दिशा मिळेल.

## संदर्भ सूची

१. भारतीय समाज आव्हाने आणि समस्या, राज लोटे, पिंपळापुरे अॅन्ड कं पब्लिशर्स, नागपूर.

२. भारतीय सामाजिक समस्या, भांडारकर शब्बीर पालकर, एस चंद अॅन्ड कंपनी प्रा.लि., रामनगर, नई दिल्ली.

३. ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, डॉ.बी.एम.,कऱ्हाडे, पिंपळापुरे अॅन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

४. समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पद्धती, प्रा.रा.ना. घाटोळे, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

५. रोजगार नोकरी संदर्भ, दिनांक १७ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर २०१६.

६. समाजशास्त्र संशोधन पत्रिका, मार्च १९९७.

❖❖❖

# जंगलांचा विनाश आणि हवामानबदल : एक अभ्यास

प्रा. एन. व्ही. नरुले
(भूगोल विभाग प्रमुख)
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

## प्रस्तावना

भारतात गेल्या तीन वर्षात काही राज्यात तसेच अनेक खेड्यांमध्ये अवर्षण व दुष्काळी स्थिती आहे. देशातील जवळपास २५६ जिल्ह्यांमध्ये अधिकृतरित्या दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्रात विदर्भ, मराठवाडा, उत्तर प्रदेशात बुंदेलखंड, तेंलगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटक इत्यादी भागातील परिस्थिती गंभीर आहे. विहिरी, तलाव, धरणेही कोरडी पडलेली आहे. नद्या सुकलेल्या अवस्थेत आहेत. आजच्या औद्योगिक युगात वाढत्या प्रदुषणामुळे आणि पर्यावरणीय संकटामुळे हवामानात मोठ्या प्रमाणावर बदल घडून येत आहे. याचसाठी आज जंगलाचे महत्त्व जाणवू लागले आहे. जंगले ही सदैव मनुष्यासाठी वरदान ठरलेली आहे. ती निसर्गाची सर्वात महत्त्वाची देणगी आहे.

## सद्य:स्थिती

भारत हा कृषीप्रधान देश असून भारताची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान आहे. अशातच भारतात काही राज्यात तसेच अनेक खेड्यामध्ये अवर्षण व दुष्काळी स्थिती आहे. विहिरी, तलाव, धरणेही कोरडी पडलेली आहे. नद्या सुकलेल्या अवस्थेत आहेत. जंगलांचा विनाश मोठ्या प्रमाणावर करण्यात आला. गेली २० ते २५ वर्षे उत्पादन खर्च भरून निघत नसल्यामुळे कर्जफेड करू न शकलेले शेतकरी आत्महत्या करीत होते; परंतु गेल्या तीन वर्षांपासून नापिकीमुळे अन्न उत्पादन होतच नसल्याने आत्महत्या होत आहेत. अवर्षण, अतिवृष्टी, महापूर, अवकाळी पाऊस, बर्फवृष्टी, घटते भूजल, उष्मांच्या लाटा, वादळे यांमुळे शेती पिकेल याची शाश्वती उरली नाही असे शेतकऱ्यांना वाटत आहे. जंगले कमी झाल्यामुळे प्राणी व पक्षी बाहेर पडून अन्नासाठी शेतात शिरून पिकांची नासधूस करीत आहे, त्यामुळे नवीन समस्या गेल्या काही वर्षात वाढताना दिसून येत आहे.

झाडे व जंगलाचा विनाश, वणवे वाईट परिणाम घडवित आहेत. ही गोष्ट मोठ्या प्रमाणावर लक्षात येत असूनही याबाबतचा अभ्यास कमी पडत आहे. तपमान वाढ आणि त्यास कारणीभूत ठरणाऱ्या कार्बनडॉयआक्साईड व यासारख्या वायूंच्या उत्सर्जनात होणारी वाढ यामुळे भयंकर परिणाम घडवून आणतील यांसाठी काही सृजन नागरिक आणि संस्था, संघटना वृक्षारोपणांचे कार्यक्रम पार पाडीत आहे. ही चांगली गोष्ट असली तरी समस्या मोठ्या असल्याने त्या कमी पडत आहे. मुळातच पृथ्वीवर माणसांनी झाडे लावली नव्हती तरी भारतात ५० ते ६० वर्षापूर्वी घनदाट जंगले अस्तित्वात होती. डोंगर व त्यावरील जंगलाचे आवरण भरपूर होते. नद्या ह्या दुथडी भरून वाहत होत्या. वंदे मातरम गीतात ''सुजलाम सुफलाम मलयज शीतलाम, सस्य शामलाम'' अशा प्रकारे भारताचे वर्णन सांगितले आहे. ही स्थिती झपाट्याने बदलत आहे.

निसर्गातील काही क्षमतांना आपण जसे मधमाशा, भुंगे, पक्षी, फुलपाखरे इत्यादींना नामशेष करीत आहोत. ज्या ठिकाणी जंगले वाढावीत तेथील मातीचे आवरण व त्याखालील डोंगर आपण दिवसेंदिवस नष्ट करीत आहोत. आज कोणत्याही महामार्गाचे बांधकाम करण्यापूर्वीचे व त्या परिसराच्या विशाल भूभागाचे चित्र आणि बांधणीनंतरचे चित्र अवलोकन केले तर असे दिसून येते की रस्त्याच्या बांधणीनंतर काही काळात जवळपासचे जंगल नष्ट झालेले व डोंगर बोडखे झालेले दिसतात. औद्योगिकरणामुळे जंगले व समुद्रातील हरितद्रव्ये नष्ट होत आहे. वाढत्या लोकसंख्येच्या खाद्यान्नांसाठी जास्तीत जास्त जंगलाखालील जमीन नष्ट करण्यात आली.

भारतात १९४७ सालात स्वातंत्र्य प्राप्ती पर्यंत सुमारे ५० टक्के जमिनीवर घनदाट जंगले होती . आता केवळ सुमारे ५ टक्के क्षेत्रावर जंगल उरले आहे. वातावरणात, हवामानात होणारा बदल किंवा त्यामुळे भूपृष्टावरील होणारी तापमान वाढ हे विनाशाशी संबधित आहे. भारताने जगाला चिरंजीव संस्कृतीचा मार्ग दहा हजार वर्षापूर्वी कृषीयुगाद्वारे दाखविला होता. हा मार्ग साधेपणा व संयमाचा होता. बाराशे वर्षाअगोदर आदी शंकराचार्य यानी ''कपिल व कणांदाच्या तंत्रबळाचा मार्ग योग्य नाही. तंत्रबळापेक्षा आत्मबल श्रेष्ठ आहे.'' असे म्हटले आहे.

महात्मा गांधी आपल्या हिंद स्वराज्य या ग्रंथात म्हणतात ''भारतीयांना यंत्र शोधता येत नव्हते असे नाही. त्यानी समजून उमजून शहाणपणाने ते टाळले.'' ते पुढे असेही म्हणतात, ''यंत्रामुळे युरोप उजाड झाला, हिंदुस्थानचेही तेच होईल, जर आपण यंत्र स्वीकारू.'' गांधीजींच्या मते भारतातील प्रत्येक शेत ही प्रयोगशाळा होती व प्रत्येक शेतकरी शास्त्रज्ञ होते.

ब्रिटीशांनी त्यांचे रासायनिक शेती तज्ञ डॉ. आल्बर्ट हॉवर्ड यांना सन १८९५ साली भारतीयांना शेती शिकविण्यासाठी भारतात पाठविले होते. त्यांनी पाच वर्ष भारतात फिरून भारतीय शेतीचा अभ्यास केला. त्यांनी त्यांच्या ''ॲन ॲग्रिकल्चर टेस्टामेंन्ट'' या ग्रंथात म्हटले आहे की ''एकाच खाचरात जमिनीचा कस जाऊ न देता शेती करणारे भारतीय शेतकरी माझे गुरू आहेत, त्यांच्याकडून मी शिकलो की, निसर्ग हा खरा शेतकरी आहे.'' ते असेही म्हणतात की ''रसायन हे पिकांचे अन्न नाही ते विष आहे.

वाढत्या औद्योगिकरणांमुळे जंगलाचा ऱ्हास होत आहे. जंगलात हजारो वर्षापासून राहणाऱ्या आदिवासींना जंगल सुरक्षित ठेवण्याच्या नावाखाली जंगलाबाहेर काढले जाते. 'अभयारण्य' असा दिशाभूल करणारा शब्दप्रयोग करण्यात येतो. शेतकऱ्यांनी हजारो वर्ष जंगलातील काडीकचरा, काटक्या जाळून चूली पेटविल्या, त्यांना दोष दिला जातो, की त्यांच्यामुळे वातावरण बदल होत आहे. आदिवासी काड्या तोडतात म्हणून शहरातील माणसे अस्वस्थ होतात; परंतु औद्योगिकरणासाठी व शहरीकरणासाठी अवैध वृक्ष व झाडे तोडली जातात, तेव्हा तो प्रतिष्ठेचा म्हणजेच कायदेशीर प्रश्न होऊन जातो.

डॉ. आल्बर्ट हॉवर्ड यांनी त्यांच्या १९३९ साली लिहिलेल्या ग्रंथात म्हटले की ''यंत्राची भूक पृथ्वी भागवू शकणार नाही.'' आता परिस्थिती बदलत चालली आहे, आपण यंत्राचे पूर्णपणे गुलाम झालेलो आहोत. यंत्रे ही कामे करण्यासाठी आहेत. पोकलेन हे यंत्र डोंगर तोडण्यासाठी, भूभाग सपाट करण्यासाठी, नद्यांची पात्रे रुंद व खोल करण्यासाठी वापरले जातात. ही यंत्रे चालू ठेवण्यासाठी डोंगर तोडले जातात. दरवर्षी भारतात उत्पादित होणारी एक लाख पोकलेन यंत्रे कोणते अपरिवर्तनीय विनाश घडवतील याची कल्पना करता येत नाही.

अलिकडेच युनेस्कोने पश्चिम घाटातील ३९ ठिकाणांना पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील म्हणून संरक्षण दिल्याचे जाहीर केले आहे. म्हणजेच पश्चिम घाटातील संरक्षित भागात होणाऱ्या खाणी, नद्यांना अडविणारी धरणे, वीज निर्मिती केंद्रे, सोबतच इतर उद्योग यामुळे हा भाग आता उद्ध्वस्त होईल. हीच गोष्ट हिमालयात व ईशान्य भारतातील सदाहरित जंगलाबाबत घडत आहे.

## जंगलांचा विनाश आणि हवामानबदल

१) पर्जन्यामध्ये घट :— वृक्षतोडीमुळे हवेचे तापमान वाढून हवेची आर्द्रता कमी होते आणि पर्जन्याच्या प्रमाणात लक्षणीय घट होते.

२) जागतिक तापमान वाढ :— निर्वनीकरणामुळे कार्बन डायऑक्साइड आणि हवेतील प्रदूषकांचे प्रमाण वाढून जागतिक तापमान वाढ होते. भारतात याचे दुष्परिणाम जाणवू लागले आहे.

३) अवर्षणाची वारंवारता आणि व्याप्ती :— वृक्षतोडीमुळे पावसाची कमतरता होऊन अवर्षणाची स्थिती निर्माण होते. मध्य महाराष्ट्रामध्ये अवर्षणाची वारंवारता वाढत आहे.

४) महापुराची शक्यता :— वनाच्छादन नष्ट झाल्यामुळे मुसळधार पावसाचे थेंब जोरात जमिनीवर येतात जमिनीत पाणी मुरत नाही, प्रसंगी पुराची स्थिती निर्माण होते.

५) वाळवंटीकरणाचा विस्तार :— वृक्षतोडीमुळे प्रदेश उजाड बनू लागतात, जोराच्या वाऱ्यामुळे खडकांचे बारीक कण वाहून नेऊन वालुकामय वाळवंटे निर्माण होतात. कमी पाऊस पडणाऱ्या प्रदेशात वाळवंटीकरणाची शक्यता असते.

६) भूमिगत पाण्याची पातळी खालावणे :— वृक्षतोड झाल्याने पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास पुरेसा अवधी मिळत नाही . पाणी वेगाने पुढे जाते. त्यामुळे भूमिगत पाण्याची पातळी खालावत जाते.

एकूणच औद्योगिकरण, शहरीकरण, हे एकाचवेळी कार्बनडॉयआक्साईड, इतर वातावरण बदल व तापमान वाढ घडविणाऱ्या वायुंची निर्मिती करते आणि जंगलाना नष्ट करते.

## संदर्भ


१) पर्यावरणीय भूगोल — डॉ. यू. बी. सिंह

२) भारताचा समग्र भूगोल — ए. बी. सवदी व पी. एस. कोळेकर

३) योजना विशेषांक


❖❖❖

# विद्यार्थ्याची सर्वांगीण सुरक्षितता पालक व शिक्षकाची जबाबदारी

प्रा. सरोज यादवराव लखदिवे
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

## सारांश

सध्या बालकांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराबाबत सातत्याने प्रकरणे घडत आहे. शाळा आणि शाळाबाह्य अशा स्वरूपाची प्रकरणे समोर येत असल्याने बालकांचे लैंगिक शोषण होऊ नये, यास प्रतिबंध लागावा यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. पालकांमध्ये जागरूकता यासोबतच बालकांसाठी असलेले कायदे आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस आणि कायद्याचे सहकार्य मिळावयास पाहिजे तसेच शाळेतपण त्यांना सुरक्षा मिळणे आवश्यक आहे. अत्याचार हा शाळेतच घडते असे नाही तर अत्याचाराच्या प्रकरणात जवळील व्यक्तींचे प्रमाण अधिक राहते, त्यामुळे बालक कुठे सुरक्षित आहे हेच कळत नाही. त्यामुळे बालकांवर होणारे अत्याचार आणि त्याबाबत असलेले कायदे, त्यांना लागणारी मदत याची माहिती समाजातील प्रत्येक घटकाला असणे आवश्यक आहे.

## प्रस्तावना

मुलांना सुरक्षित वातावरण देण्याची जबाबदारी ही प्रत्येकाची आहे. मात्र प्रत्येकजण आपली जबाबदारी दुसऱ्यावर ढकलत आहे. हा प्रकार बंद होणे आवश्यक असून प्रत्येकाला आपल्या जबाबदारीची जाणीव असणे आणि त्याप्रमाणे वागणे गरजेचे आहे. अनेक कारणामुळे आज विद्यार्थी असुरक्षित झाले आहे. मुलांच्या कोवळ्या वयात त्यांच्यावर होणारे अत्याचार या समस्येने गंभीर रूप घेतले आहे. मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी पालक, मुलांमध्ये जसा संवाद आवश्यक आहे तसाच शिक्षक व विद्यार्थी आणि शिक्षके व पालकांमध्ये देखिल संवादा झाला पाहिजे. पालक, शिक्षक व मुलांमध्ये खुला संवाद होणे आवश्यक आहे. मुलांना शरीराचे प्रायव्हेट पार्ट, त्यांच्यावर होणारे अत्याचार, तशा व्यक्तींचे हावभाव, त्यांची हालचाल अशा गोष्टींचे ज्ञान असणे आवश्यक आहे. घरातून मुल बाहेबर पडल्यापासून घरी परत येईपर्यंत प्रत्येक ठिकाणी मुलांची सुरक्षितता महत्वाची आहे. पालकांनी प्रत्यशेक टप्प्यांवर सतर्क असणे महत्वाचे आहे. शिक्षक आणि पालक हे मुलांचे खरे समुपदेशक आहे. परंतु प्रत्येकजण आपापली जबाबदारी एकमेकांवर ढकलतात. मुलांची जबाबदारी फक्त एका घटकावर टाकुन चालणार नाही तर सर्व समाजाने ती जबाबदारी सांभाळायला पाहिजे. शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांमधील विसंवादामुळे ही असुरक्षितता निर्माण होत आहे.

## बालकांचे पालकासोबत संबंध

बदलत्या काळानुसार पालक आणि मुलांचे संबंधही बदलत जातात. वडिलांनी हाक मारल्यावर थरथरणाऱ्या मुलामुलींचा काळ केव्हाच मागे पडला आहे. पूर्वी कुठल्याही गोष्टींची चर्चा मुलांसमोर केली जात नसे. वडील माणसे सांगतील ते ऐकायचे असेच होते. त्यामुळे मुलांनी आपले ऐकावे असे वाटणे साहजिकच होते. मुलांनी आपल्या वस्तू नेहमीच्या जागी ठेवाव्या, मैदानी खेळ खेळावे, टीव्ही, कॉम्प्युटर कमी वापरावा असे पालकांना वाटते परंतु यातले काहीच होत नाही. या गोष्टींशिवाय मुलांचे पानही हालत नाही. या गोष्टींच्या आहारी मुलांनी जाऊ नये असे पालकांना वाटते. पालक उपदेश करतात हेच मुलांना आवडत नाही. सतत ओरडणे, मुलांना रागावणे या गोष्टींशिवाय केव्हा तरी मुलांचे सर्वांसमोर कौतुक करायला हवे, त्यांच्याशी मायेने बोलायला हवे.

आपण कितीही वेळा सांगितले तरी पण मुले आपल्या मनाप्रमाणेच करतात अशा वेळी त्रागा न करता मुलांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मुलांसोबत जास्तीत जास्त वेळ घालविला पाहिजे. पालकांसोबतच राहून मुले अनेक गोष्टी शिकत असतात व मग आपणे म्हणणे हळूहळू ऐकायला लागतात. सुसवांद हा

महत्त्वाचा असतो. पालक, बालक संबंधांमध्ये प्रेम, जिव्हाळा मिळत असेल तर मुले समायोजित व समाजमान्य असे वर्तन करू लागतात. आनंदी वातावरणामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. उलट जे पालक मुलांना रागावतात, मुलांना कडक शिक्षा करतात अशा मुलांचा समाजविरोधी कृत्यांकडे असतो.

पालक बालक संबंध मैत्रीपूर्ण असल्याची गरज सध्याच्या वातावरणात आवश्यक आहे. बाहेर मुलामुलींसोबत काय घडत आहे हे पालकांना माहीत असणे आवश्यक आहे. मुलांनापण एवढा विश्वास आईवडिलांवर असणे आवश्यक आहे, की आईवडील माझ्यावर विश्वास ठेवतात व प्रत्येक गोष्टीत मार्गदर्शन करतात. मुलांमध्ये काही बदल जाणवत असल्यास पालकांनी लगेच त्याबद्दल चौकशी करायला पाहिजे. आपल्या घरात कोण येते, त्यांची मुलांसोबत वागणूक कशी आहे या गोष्टींची काळजी घ्यायला पाहिजे. शिवाय पालकांनी मुलांनी मानसिकता समजून घेणे आवश्यक आहे. मुलांशी प्रेमपूर्वक वागणूक अर्थपूर्ण व विश्वासपूर्ण संवाद साधल्यास तितक्याच विश्वासाने बालक आपल्या समस्या आवडीनिवडी, इच्छा पालकांना सहज सांगतात म्हणून त्यांचे मित्र बनून नेहमी मदतीचा हात द्यावा आवश्यक तिथे धोक्याचे सूचना सांगाव्या. मुलांशी संवाद सकारात्मक दृष्टीने साधावा.

## बालकांचे शिक्षकासोबत संबंध

मूल घरच्यापेक्षा जास्त वेळ शाळेत शिक्षकाचा सान्निध्यात असतात. त्यामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांचे सबंध चांगले असणे आवश्यक आहे. मुलांना शिक्षकाप्रती आदर असावा. धाक किंवा भीती असू नये. विद्यार्थ्यासोबत शिक्षकाचे मैत्रीचे नाते असते तेव्हाच मूल त्यांच्यासोबत चुकीचे वर्तन घडल्यास शिक्षकांना सांगू शकेल. मुलांचे आयुष्य पालटून टाकण्याचे कसब शिक्षकांकडे असते. मुलांना बोलके करण्याचे काम शिक्षक करत असतात. शिक्षण घेत असताना काही मुले जी संवाद साधण्यात कमजोर पडतात, आपले म्हणणे त्यांना मांडावयाचे असते; परंतु घाबरल्यामुळे ती आपले म्हणणे व्यक्त करू शकत नाही अशा मुलांना धीर देणे गरजेचे असते, त्याला कुठल्यातरी त्याच्या आवडीच्या विषयांवर बोलायला लावलं पाहिजे. शिक्षकाने विद्यार्थ्याला 'तुला हे करताच येत नाही' असे न म्हणता 'तू ते व्यवस्थित करू शकतोस' अशाच शब्दांनी त्याचा आत्मविश्वास वाढविणे महत्त्वाचे असते. मुलींच्या शाळेत स्त्री शिक्षकांची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यांनी विद्यार्थिनींना शारीरिक वाढीसंबंधी पूर्णत: जाणीव करून द्यावी. शिक्षक व विद्यार्थी यांच्यात मैत्रीचे नाते असणे आवश्यक आहे. विद्यार्थी मुक्तपणे आपल्या मनातील गोष्टी उघड करतील.

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपाययोजना

जिह्यात बालकांवर होणारे लैंगिक अत्याचाराबाबत सातत्याने प्रकरणे घडत आहे. शाळा आणि शाळाबाहेरही अशा प्रकारची प्रकरणे समोर येत आहे. अशा प्रकारची कृत्ये घडू नये यासाठी शाळांमधून बालकांसाठी असलेल्या हेल्प लाईनची माहिती, तक्रारकर्त्यांचे नाव गोपनिय ठेवण्याची व्यवस्था आदी बाबी या उपक्रमात प्रामुख्याने घ्याव्यात. शाळा हा केंदबिंदू असल्याने शाळांच्या व्यवथापनाला विश्वासात घेऊन ही जाणीव जागरूकता राबवावी. बालके ही प्रामुख्याने शाळेत जात असल्यामुळे त्याठिकाणी त्यांना सुरक्षा मिळणे गरजेचे आहे. बालकावर अत्याचार होणार नाही यासाठी बालक, पालक आणि शिक्षकांमध्ये आपसी सामंजस्य असणे आवश्यक आहे. शाळेला पालकांनी भेटी द्याव्यात, विद्यार्थ्यांशी हितगुज करून त्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात. समाजानेही अशा घटना दिसत असल्यास एक जबाबदार घटक म्हणून पुढे यावे. बालकांच्या वर्तनात काही फरक आढळल्यास बारकाईने चौकशी करावी. बालकांना त्यांच्या शरिराला होत असलेल्या स्पर्शाबाबत माहिती द्यावी, असे वर्तन होत असल्यास पालकांना माहिती देण्यास सांगावे. शाळेत बालकांसाठी असलेल्या हेल्पलाईनचे बोर्ड लावावे जेणेकरून ते त्याच्यासमोर कायम राहिल्यास अशा प्रकारचे वर्तन झाल्यास त्याबाबत ते तक्रार करू शकतील. अशी तक्रार करण्यासाठी बालकांना त्याच्या पालकांसोबतच शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असते. बालकांसाठी असलेल्या कायद्याची त्यांना माहिती द्यावी.

## निष्कर्ष

जिल्ह्यामध्ये सातत्याने बालकांवर लैंगिक अत्याचाराची प्रकरणे समोर येत आहे. मुलांच्या कोवळ्या मनावर झालेला आघात कधीही भरून निघू शकत नाही. मुलांचे मानसिक आरोग्य बिघडल्यास त्यांचे संपूर्ण

आयुष्यच उद्‌ध्वस्त होते. यासाठी या विरोधात सर्व समाजाने जागृत होणे आवश्यक आहे. पालकांनी सतत शाळा व शिक्षकांच्या भेटी घेतल्या पाहिजे व बालकांच्या वागणुकीचा बारकाईने अभ्यास केला पाहिजे.

## संदर्भ

दिव्य मराठी– ऑगस्ट, २०१६
विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ आणि व्यक्तिमत्त्व विकास– डॉ. संगिता घुईखेडकर

❖❖❖

# महानुभावीय मराठी वाङ्मय : एक अभ्यास

प्रा. डॉ. गजानन गोपाळराव हेरोळे
श्रीमती कोकिळाबाई गावंडे महिला महाविद्यालय, दर्यापूर
E-mail : dr.herole@gmail.com भ्रमणध्वनी ९४२३४२७०६३

## सारांश

महानुभाव साहित्याचे सखोल चिंतन केले तर असे जाणवते की, दहाव्या शतकानंतर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात फार मोठे परिवर्तन झाले. जैन, लिंगायत, वारकरी व नाथपंथीयांनी लोकभाषांचा आश्रय घेऊन आपल्या पंथाचे तत्वज्ञान समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोचविले. राजसंस्थानांचा जाच समाजाला होता. पारतंत्र्य व गुलामीच्या जोखडामुळे सामान्य आर्य दांभिकतेकडे झुकला होता. या काळात मानवाची प्रतिज्ञा तृप्त होण्याच्या मार्गावर होती. राजकीय आक्रपणामुळे, स्वधर्म, स्वसंस्कृती अध:पतित होऊ लागली होती. या सर्व घटनांची जाणीव स्थायी चक्रधरांसारख्या द्रष्ट्यास संतांनी घेतली व महानुभाव तत्वज्ञान विषयक सात गद्य ग्रंथ व सात पद्य ग्रंथ लिहून महानुभाव ग्रंथकारांनी मराठी भाषेला वैभव प्राप्त करून दिले. अशा प्रकारे नीतीतत्त्व व आचारधर्माचे निरूपण महानुभाव साहित्यात आढळते.

मुकुंदराजांनंतर व ज्ञानेश्वरांच्या काही काळ अगोदर महानुभाव संप्रदाय भरतात उदायास आला. महान अनुभवोत्सेजा बल वायस्य स: महानुभाव या दृष्टीने मोठ्या तेजाने युक्त असलेल्या लोकांचा मार्ग तो महानुभाव पंथ असे म्हटल्या जाते. वि.भि. कोलते यांच्या मते, या संप्रदायाचे मूळचे नाव, परमार्ग असून महानुभाव पंथ हे नाव प्रथम एकनाथांनी वापरले असल्याचे शं.गो. तुळपुळे म्हणतात. महानुभाव पंथाचे मूळ पुरुष गोविंदप्रभू उर्फ गुंडम राउळ हे होते. परंतु या पंथाचे प्रणेते मात्र चक्रधर आहेत. चक्रधरांचा कालखंड (इ.स. ११९४ ते १२८२) हा महाराष्ट्रातील ऐश्वर्याचा व समृद्धीचा कालखंड समजला जातो. देवगिरीच्या यादवांची कारकीर्द यावेळी महाराष्ट्रात होती.

समाजात चातुवर्ण्यांची मिरासदारी वाढलेली असण्याच्या कालखंडात चक्रधरांनी शंकराचार्य (अद्वैत) व रामानुजाचार्य (विशिष्टद्वैत) यांच्या तत्त्वज्ञानाचा मिलाप करून (ज्ञान आणि भक्ती) यांचा समन्वय करून आपल्या द्वैती तत्त्वज्ञानाचा प्रसार केला.

बीज शब्द : पंचकृष्ण, अवतार, लीळा, स्मृती,जीव, जगत, चक्रधर, केशिराज

## प्रस्तावना

समारे आठशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रात यादवकाळ होता. ह्या काळात माणूस माणुसकीला पारखा झाला होता. धर्माची दालने जनसामान्यांसाठी बंद होती. धर्माची मक्तेदारी एका विशिष्ट वर्गाकडे होती. मंदिरात जाऊन देवदर्शन त्याला घेता येत नव्हते. दुरूनच देवळाचे दर्शन घेऊन त्यांनी हात जोडावे त्यांच्या सावलीचा स्पर्शसुद्धा उच्चवर्गीयांना सहन होत नव्हता. त्यांनी फक्त उच्चवर्णीयांची चाकरी करावी हाच त्यांचा धर्म बनला होता. ह्या सर्व गोष्टी समाजातून नाहीशा व्हाव्या या दृष्टीने श्री गोविंदप्रभूंनी समाजावर जोरदार मात केली.

श्री चांगदेव राऊळांपासून शक्ती स्वीकार करणारे रिद्धपूरचे गोविंदप्रभू हे अनंत नायक वडील आणि नेमाईसा माता या काण्वशाखीय ब्राह्मण कुटुंबापासून काटसुटे (रिद्धपूर जवळ) या ठिकाणी जन्माला आले. श्री. गोविंदप्रभूंनी आपले आयुष्य दु:खीकष्टी लोकांच्या सेवेत खर्च केले. वर्णाश्रमाची व जातिभेदाची सर्व तत्कालीन बंधने झुगारून देऊन तेली, माळी, महार, मांग, कुणबी आदी सर्व जातीच्या घरचे अन्न ग्रहण केले. अनेकांचा विकल्प दूर केला. अनेक दु:खीकष्टी लोकांकरिता त्यांनी आपले सारे जीवन व्यतीत केले. तत्कालीन, समाजरचना जातिभेद व विषमतेची सारी बंधने तोडून हा महापुरुष सर्वसामान्य लोकांचा राऊळ बाप बनला.

महानुभाव पंथाचा उदय होण्यापूर्वी महाराष्ट्रात सर्वसाधारण परिस्थिती फारच बिकट होती. ती म्हणजे देवतोपासनेचा मार्ग, कर्मकांड व सामाजिक भावनांवर पोसले जाणारे ब्राह्मणाचं या सर्वच गोष्टी साधारण माणसाला दूर ठेवणाऱ्या होत्या. ह्या गोष्टी जर कुणी लक्षात आणून दिल्या असेल तर आठशे वर्षापूर्वी जन्माला आलेल्या वऱ्हाडप्रांतीय गोविंदप्रभुनींच!

श्री गोविंदप्रभूंच्या चरित्रातून त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांनी केलेले सामाजिक कार्य यांचे आपल्याला दोन पैलू पहायला मिळतात एक म्हणजे अलौकिक सामर्थ्य संपन्न असलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि दुसरे व्यक्तिमत्त्व म्हणजे लौकिक पातळीवर वावरणारे सर्वसामान्य व्यक्तिमत्त्व हे व्यक्तिमत्त्व बुद्धिगम्य आणि समाजमान्य आहे तसेच निर्विकार विकल्पादिनी सुद्धा आहे.

श्री प्रभूंच्या लौकिक व्यक्तिमत्त्वाचा सर्वप्रथम कोणता विशेष असेल तर त्यांनी तत्कालीन समाजातील ब्राह्मण्याला केलेला प्रखर विरोध, वैदिक काळापासून ब्राह्मणांचे ब्राह्मण्य कसे फोफावत होते, याचा शोध घेण्याचा प्रयत्न आपण केलाच पाहिजे. ब्राह्मण वाईट नाही, वाईट आहे त्यांच्यातील ब्राह्मण्य. सर्वसामान्य माणसाला दूर ठेवून स्वत:च्या सोयीसाठी ब्राह्मणांनी स्वत:साठी काही नियम केले होते. या नियमातून बहुजनांचे खच्चीकरण झाले, ते ब्राह्मण्य प्रारंभापासूनच आहे. श्री प्रभूंच्या काळातही होते. सोवळे, ओवळे, विटाळ, अस्पृश्यता या भयानक गोष्टींचा त्रास मनुष्याला भयंकर होत होता. श्री प्रभुंनी त्या सर्व गोष्टींना आपल्यातून देऊन समाजरचनेचे स्वप्न प्रत्यक्षात साकार केले.

## समारोप

श्री प्रभू घरोघरी जात. त्या घरचे अन्न ते गोडीने खात आणि त्यांच्या जीवनाशी ते समरस होत कारण जातिभेद, वर्णभेद आणि विषमतेची बंधने झुगारून देणाऱ्या या परमपुरुषाच्या ठिकाणी सर्वच मनुष्य मात्रासंबंधी अत्यंत जिव्हाळा होता. त्यामुळे घरी कुणी नसेल तर त्या घरच्या बाईचे मूल सांभाळणे, पाणी भरण्यास गेलेल्या बाईचे मूल सांभाळणे, कुणाचे लेकरू घरी नेऊन पाळण्यात झोपविणे, तसेच स्वत: दूध पिऊन सुनेस फक्त ताक वाढणाऱ्या खाष्ट सासूच्या घरी जाऊन त्या सुनेला काम करताना पाहून स्वत: काम करणे, एखाद्या स्त्रीची पाठ घासून देणे, कुणाचा तांब्या भरून आणणे, कुणाचे मुसळ धरणे, कोणाला जेवू घालणे, जिचे कोणीच नाही अशा असहाय्य स्त्रीचे बाळंतपण करणे, तिला वाढणे, आंघोळीस पाणी देणे, थंड वाऱ्यापासुन त्या बाळंतिणीचा आणि त्या बाळाचा बचाव करणे इत्यादी कामे गोविंदप्रभूंनी केली. कोणत्याही कामात त्यांनी आपला कमीपणा मानला नाही. मनुष्यमात्रासंबंधी अमर्याद प्रेम आणि उत्कट जिव्हाळा घेऊन ते निरामय प्रेमस्वरूप रिद्धपूर परिसरात ते वावरत होते. निस्पृह वागणूक, कडकडीत (सामर्थ्य) ब्रह्मचर्य आणि मनुष्यमात्रासंबंधी उत्कट जिव्हाळा हा त्यांच्या स्वरूपाचा स्थायीभाव होता त्यांच्या या वागणुकीमुळेच रिद्धपूर परिसरातील सर्वसामान्य लोकांच्या श्रद्धेचे माहेरघर बनले होते.

श्री प्रभूंच्या अंगी दैवी शक्ती असल्यामुळे त्यांना दुसरीकडे हाकलण्याची किंवा शिक्षा देण्याची हिंमत तत्कालीन महाजनास होऊ शकली नाही आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे गोविंदप्रभू स्वत: आपणाकडून समता, मानवतेची आणि विषमतेला दूर करणारी वागणूक सर्व जाती धर्माच्या लोकांना देत असत.

या सर्व पार्श्वभूमीचा विचार केला तर श्री गोविंदप्रभूंचे हे कार्य श्रेष्ठ व अनन्यसाधारण असे आहे. हा महाराष्ट्र ज्ञानोबा–तुकोबा यांचा झाला; परंतु महाराष्ट्राची अस्मिता सतत वृद्धिंगत करणाऱ्या श्री गोविंदप्रभूंचा श्री चक्रधरांचा म्हणून सोयीस्कर रीतीने विसरला .

आचार – विचार सामाजिक संकेत आणि रूढी, सांस्कृतिक कल्पना या सर्वांचा मिळून समाजाचा इतिहास सिद्ध होत असतो. नुसत्या राजकीय घटना म्हणजे इतिहास नव्हे आणि या दृष्टीने या ग्रंथाकडे व साहित्याकडे पाहिले म्हणजे एक अमूल्य ठेवा आहे.[१]

महानुभाव हा सिद्धांतावर आचारलेला संप्रदाय आहे. जीव, जगत व देवता यांपासून पूर्णपणे स्वतंत्र असणारा एक नित्ययुक्त परमेश्वरच मुक्ती देण्यास समर्थ आहे.[२] हाच सिद्धांतच खरा महानुभाव सांप्रदायिक तत्त्वज्ञानाचा पाया आहे.

## निष्कर्ष

१. महानुभाव पंथकालीन महाराष्ट्र हे एक संपन्न राष्ट्र होते.

२. महानुभाव साहित्य म्हणजे गुरूश्री चक्रधर स्वामी व शिष्य श्री केसिराजबास या गुरूशिष्याची जोडकृती होय.

३.महानुभाव पंथ एक संन्यासमार्ग असून तो निवृत्तीपर पंथ आहे.

४. महानुभाव पंथात मूर्तीपूजा व जातिभेदाला धारा नाही.

५. अद्वैती तत्त्वज्ञानापासून वेगळी व स्वतंत्र तत्त्वप्रणाली असलेले दैती संप्रदाय म्हणजे महानुभाव पंथ होय.

## संदर्भ


१. प्राचार्य डॉ. बी. एन. पाटील, प्रा. डॉ. शिरीष बी. पाटील, श्री चक्रधर स्वामी लीळाचरित्र एकाक, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, तृतीय आवृत्ती २०१४ पृ.क्र. २४

२. वसंत निवृत्तीराव पाटील, महानुभाव वाङ्मय स्मृतिस्थळ – भाषिक अभ्यास, अथर्व पब्लिकेशन, जळगाव, प्र. आ. २०१२, पृ.क्र. १६


## संदर्भ ग्रंथ


प्रा. भालचंद्र सोहनी, लीळाचरित्र : एकांक सार्थ, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, प्र.आ. २०१०


❖❖❖

# संत तुकारामांचा आत्म साक्षात्कार

प्रा. डॉ. हरिदास देविदास आखरे
श्रीमती कोकीळाबाई गावंडे महिला महाविद्यालय
दर्यापूर, जि. अमरावती
Email- hdakharegmail.com  भ्रमणध्वनी ७५८८५६६४००

## सारांश

महाराष्ट्र ही संतांच्या आध्यात्मिक कार्याने पावन झालेली भूमी म्हणून ओळखली जाते. संतांनी लोकोद्धाराच्या कार्याद्वारे शक्तीची महती पटवून दिली. काळासोबत अनेक संप्रदाय या भूमीत निर्माण झाले. सर्व संतांचे एकच ध्येय होते, ते म्हणजे लोककल्याण. आपल्या अभंगवाणीतून त्यांनी प्रबोधन, उपदेशाद्वारा समाजमनावरील सात्त्विक प्रभाव आजतागायत कायम ठेवला आहे. भारतीय संस्कृतीमधील धर्म, पंथ, जाती, भाषा यांतील विविधतेतील एकता आपल्याला संत साहित्यामध्ये ठळकपणे दिसते. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांनी एक प्रकारची 'आध्यात्मिक लोकशाहीच' मध्ययुगीन काळात निर्माण केली होती. लोकप्रबोधन हाच आपल्या जीवनकार्याचा हेतू त्यांनी स्पष्ट केलेला दिसतो.

आम्ही वैकुंठवासी । आलो याचि कारणासी ।
बोलिले जे ऋषी । साच भावे वर्ताया ।।
(तु.गा. ५२०)

त्याद्वारा त्यांनी लोकप्रबोधन करून समाजमनाला योग्य संस्कार, ज्ञान व जीवनमूल्ये दिली; जी मानवसमाजाला जीवन जगताना बहुपयोगी व योग्य दिशादर्शक आहेत. याच परंपरेतील संत तुकाराम हे एक क्रान्तदर्शी लोकशिक्षक आहेत, असे दिसून येते. संत तुकारामांच्या अभंगवाङ्मयाचे सखोल परिशीलन केल्यास असे आढळून येते की, 'जीवनमूल्ये'तुकोबांच्या अभंगवाङ्मयाचा आत्मगाभा आहेत. जगातील सर्व दु:खांची निवृत्ती आणि परमानंदाची प्राप्ती केवळ जीवनमूल्ये आचरणामुळेच होऊ शकते, हा त्यांचा त्रिकालाबाधित सिद्धांत त्यामधून त्यांनी मांडला आहे. हा त्यांचा आत्मप्रत्यय असल्याचे ते सांगतात. —

तुका म्हणे चाखुनी सांगे । मज अनुभव आहे अंगे ।।
(तु.गा. १०९३)

**बीजशब्द** : जीवनमूल्ये, अनु व, कसोटी, लोकशिक्षण,आत्मप्रत्यय, प्रबोधन, समाजमन

## प्रस्तावना

संत तुकाराम केवळ ग्रंथप्रामाण्यवादी नव्हते, तर प्रतीतप्रामाण्यवादी होते. हे त्यांच्या साक्षात्काररूपी आनंदमयी आत्मानुभूतीच्या वचनांद्वारे स्पष्ट होते. जीवनमूल्यांच्या आचरणावर आधारित साक्षात्काराचा आनंद त्यांनी असा व्यक्त केला आहे.—

तुका म्हणे खातो आनंदाचे लाडू । नका चरफडू घ्यारे तुम्ही ।।
(तु.गा. ४०८०)

तुका म्हणे आम्ही राजे त्रैलोक्याचे । परि नाही कोणाचे उणे पुरे ।।
(तु.गा. १२८२)

साक्षात्काराच्या अत्युच्च आनंदाचा लाभ सर्वांना व्हावा, मानवी जीवन कृतार्थ, धन्य व्हावे, यासाठीच संत तुकारामांचा सर्व अट्टाहास होता. जीवनमूल्य आचरणाव्यतिरिक्त अन्य कोणत्याच उपायांनी जीवनातील संपूर्ण दु:खाचा नाश आणि अत्युच्च सुखाची प्राप्ती होऊ शकत नाही, असे त्यांनी अत्यंत कळकळीने स्वानुभवपूर्वक सांगितले. कारण तुकारामांना दु:खात बुडालेले लोक पाहवत नाहित.

बुडता हे जन न देखवे डोळा । येतो कळवळा म्हणवूनिया ।।
(तु.गा. ९४२)

त्यांचा अवतार हा केवळ जगाच्या कल्याणासाठीच होता. लोकहिताचा कळवळा त्यांच्या वृत्तीमध्येच होता. संत तुकारामांनी जगाच्या कल्याणासाठी चंदनाप्रमाणे देह झिजविला. धर्माचे रक्षण हे त्यांच्या अवताराचे प्रयोजन त्यांच्या विविध वचनांद्वारे स्पष्ट होते.

धर्म रक्षावयासाठी । करणे आटी आम्हांसि ।।

(तु.गा. २६०)

जगाच्या कल्याणा संतांच्या वि ूती । देह कविती परउपकारे।।

(तु.गा. १५०५)

आपल्या अमृतवचनाद्वारे त्यांनी जगाला जीवनमूल्यांचा उपदेश केला. ईश्वरप्राप्तीसाठी केवळ चित्त शुद्धीची आवश्यकता आहे, असे ते सांगतात.—

तुका म्हणे चित्त झालिया निर्मळ।येवोनि गोपाळ राहे तेथे ।।

(तु.गा. २७४२)

ईश्वरप्राप्तीसाठी घरदार सोडून वनात जाण्याची आवश्यकता नाही. उलट ईश्वर घरी येण्याचा सोपा भक्तिमार्ग त्यांनी जगाला दाखवला.

नामसंकीर्तन साधन पै सोपे। जळतील पापे जन्मांतरीची ।।१।।
नलगती सायास जावे वनांतरा । सुखे येतो घरा नारायण ।।ध्रु।।
ठायीच बैसोन करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा।।२।।
रामडुष्ण हरी विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ ।।३।।
यावीण असता आणिक साधन । वाहातसे आण विठोबाची ।।४।।
तुका म्हणे आहे सर्वाहूनी । शहाणा तो धनी घेतो येथे ।।५।।[१]

(तु.गा. २४४८)

योग्य जीवनमूल्यांचे आचरण केल्यानंतरच सर्व जीवनमूल्यांची अत्युच्च अवस्था असलेला आत्मसाक्षात्कार माणसाला प्राप्त होऊ शकतो. त्यासाठी संत तुकारामांसह सर्वच संतांनी साक्षात्काराचा उपरोक्त वर्णन केलेलाएवढासोपा मार्ग दाखवला; परंतु किती लोक साक्षात्काराप्रत पोचतात? तर 'मनुष्याणाम् सहस्रेषु'. त्याची कारणमीमांसा अशी —

१) ईश्वरसाक्षात्काराचा अधिकार सर्वांना असला तरी पात्रता मात्र सर्वांची नसते. साक्षात्कारासाठी अंतरंग अधिकारी लागतो, असे संत ज्ञानेश्वर सांगतात.

तैसे अध्यात्मशास्त्री इये । अंतरंगचि अधिकारिये ।।
परि लोकु वाक्चातुर्ये । होईल सुखिया ।।[२]

(ज्ञाने.—अ. १८ ओ. १७४९)

२) साक्षात्कारी पुरुषांची दुर्ल ता असल्यामुळे यथार्थ मार्गदर्शनाची गरज पूर्ण होत नाही. संत एकनाथ साक्षात्कारी पुरुषांच्या दुर्ल तेबद्दल लिहितात—

ऐसे प्राप्त पुरुष येथ । संसारी नाहित गा बहुत ।।
हिंडता अवघ्या जगात । एखादा देखिजे ।।[३]

(ए.भा. २२/५८०)

३) समाजात आत्मसाक्षात्कारीविषयी अनेक गैरसमज आहेत. अंधश्रद्धेपायी लोक कोणालाही साक्षात्कारी पुरुष समजतात. काही लोक स्वत:च्या पोटासाठी, कीर्तीसाठी अशा अनेक गोष्टी करतात. उदा. — १) भूतभविष्य सांगतात. २) मनातील विचार ओळखतात. ३) पाणी किंवा अग्नीवरून चालून दाखवतात. ४) हिंस्र पशूवर काबू मिळवतात. ५) जवळ नसलेला पदार्थ हातातून काढून दाखवतात. ६) भयानक आजार विभूतीद्वारे बरा करतात. अशा अनेक चमत्कारांना लोक बळी पडतात व ते करून दाखवणाऱ्या भोंदूलाच साक्षात्कारी समजतात. म्हणून लोकांना यथार्थ मार्गदर्शनाद्वारे प्रबोधनाची तीव्र गरज असते. परमेश्वर कुठेतरी दूर आहे. तो जप, तप केल्याने मनुष्यासमोर प्रकट होतो, त्यासाठी घराचा त्याग करून संन्यास घ्यावा लागतो. अशा भ्रामक कल्पना लोकांच्या डोक्यात घर करून बसलेल्या असतात. त्यामुळे लोकांना खरा साक्षात्कार होऊ शकत नाही. आत्मा, ब्रम्ह, साक्षात्कार या संकल्पना अधिकाधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न संतांनी केला आहे. संपूर्ण विश्वाच्या मुळाशी असलेली चैतन्यशक्ती कधीही नाश न पावणारी आहे. ती काल होती, आज आणि उद्याही राहणार आहे. त्या

चैतन्यशक्तीलाच माणसाने आत्मा हे नाव दिले. त्यापूर्वीही तो होताच. शरीराच्या आत म्हणून 'आत्मा' आणि चराचराला व्यापून असल्याने त्यालाच 'ब्रम्ह' असे म्हणतात.

उपनिषदात ब्रम्हाची व्याख्या अशी केली आहे–सतत बदलणाऱ्या अंत:करण वृत्तींना विषयरूपाने जे जाणते, साक्षी राहते ते 'साक्षीचैतन्य' म्हणजे ब्रम्ह होय. वृत्तीसारखे ते प्रवाही नसते. कोणताही विकार अथवा परिणाम ज्यात कधीच घडून येत नाही, अशा स्वरूपाचे तत्त्व म्हणजे ब्रम्ह होय. अशी सर्वच ब्रम्हविचारयुक्त जीवनमूल्ये संत तुकारामांच्या वचनांच्या आधारे प्रस्तुत पुस्तकात स्पष्ट केली आहेत व त्याला आधार म्हणून संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ व एकूणच सर्व संत प्र ावळ यांच्या वचनांचा आणि वेद, उपनिषद, गवद्‌गीता, भाष्यकार यांच्या मतांचा आवश्यक त्या ठिकाणी उल्लेख केलेला आहे.

एकच चैतन्यशक्ती मनुष्याच्या आत बाहेर खेळत आहे. त्या शक्तीचे अन्वय व्यतिरेक सहित दर्शन;ही प्रस्तुत शोधनिबंधाची फलश्रुती होय. जीवनमूल्याधारित संत तुकारामांच्या वचनांच्या आधारे अविनाशी, सच्चिदानंद स्वरूप परमेश्वराचे दर्शन'याचि देही' आपणास घडू शकते.तुकोबा आत्मविश्वासपूर्वक सांगतात–

तुका म्हणे तुम्ही चला याचि वाटे । भरवशाने भेटे पांडुरंग ।।

(तु.गा. ३७२८)

विज्ञानयुगाने मानवाला असंख्य भौतिक सुखांची सेवा त्याच्या दारात हात जोडून उभी करून दिली आहे; परंतु दिवसेंदिवस सुखलालसेमुळे मानवी जीवनाचा आधार असलेली जी मौलिक जीवनमूल्ये आहेत, त्यांच्याकडे पाठ फिरवली गेली. नैतिक मूल्यांचा हा ऱ्हास मानवाच्या विनाशाला कारणीभूत ठरत आहे. शांतीचे, समाधानाचे जीवन जगण्यासाठी पैशासोबतच सद्विचार, सत्संगत, व सत्कर्माची आवश्यकता आहे. आज त्यांचा सर्वांना विसर पडलेला दिसतो.–

कलीधर्म मागे सांगितले संती । आचार सांडिती द्विजलोक ।।१।।
ते चि आतां कळो येतसे प्रचिती। अधर्मा टेंकती धर्म नव्हे ।।ध्रु ।।
तप व्रत करितां लागती सायास। पाळिता पिंडास गोड वाटे ।।२।।
देव म्हणऊनी न येती देऊळा । संसारा वेगळा तरी कां नव्हे ।।३।।
तुका म्हणे मज धरितां गुमान । ऐसे कोणी जन नरका जाती ।।४।।[४]

(तु.गा. ११२४)

त्यामुळेच समाजात, राष्ट्राराष्ट्रांत जीवघेणी स्पर्धा, भ्रष्टाचार, अराजकता पसरलेली आहे. त्याला थांबविण्यासाठी आपल्या भारतीय संस्कृतीचा मूलाधार असलेली मूल्यसंकल्पना संत तुकारामांच्या अभंगवाङ्मयातील जीवनमूल्यांच्या रूपाने अभ्यासण्याचा प्रामाणिक प्रयत्न व्हायला हवा त्यामुळे संत तुकारामांनी सांगितलेल्या जीवनमूल्यांची आपणास नव्याने ओळख होईल व त्यांच्या अनुकरणाने आपले जीवन खऱ्या अर्थाने समाधानी, शांततामय व परिपूर्ण होईल. जीवनमूल्यांच्या या मार्गाने संत तुकारामांनी आत्मसाक्षात्काराने आपले जीवन सार्थक केले व लोकांच्या कल्याणाकरिता वाङ्मयाच्या रूपाने ती जतन करून ठेवलेली आहेत. त्याचा उलगडा होण्याची वेळ आज आलेली आहे. समाजाला त्याची आज निकडीची गरज आहे. त्यांची मूल्ये समाजाला दिशा दाखविण्यासाठी 'दिशादर्शक दीपस्तं ' म्हणून आवश्यक आहेत. विज्ञानयुगात जीवनमूल्यांचा विसर पडल्यानेच ही अस्थिरतेची भयावह स्थिती निर्माण झाली आहे.

## समारोप

संत तुकारामांच्या काळात झालेल्या नीतिमूल्यांचा ऱ्हास तुकारामांच्या अभंगवाणीने भरून निघाला. आधुनिक विज्ञानाच्या काळात झालेली नीतिमूल्यांची हानी भरून काढण्यासाठी संत तुकारामांच्या वाङ्मयाशिवाय पर्याय नाही. संत तुकारामांनी हा जीवनमूल्यांचा मौलिक ठेवा आपल्या अभंगवाङ्मयात चारशे वर्षांपासून जतन करून ठेवला आहे. त्याची समाजाला, या तरुण पिढीला नव्याने ओळख करून देण्याची गरज आहे[५]. मानवी जीवनाच्या निरामय कल्याणासाठी त्याचा उपयोग होईल. संत ज्ञानेश्वरांच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे–

दिसो परतत्त्व डोळा । पाहो सुखाचा सोहळा
रिघो महाबोध सुकाळा । माजी विश्व ।।

(ज्ञाने.– १३/११६१)

अवघ्या विश्वाचे कल्याण साधण्याचे सामर्थ्य संत तुकारामांच्या विचारामध्ये आहे. तशी प्रतिज्ञाच त्यांनी केलेली दिसते.

अवघाचि संसार सुखाचा करिन । आनंदे रिन तिन्ही लोक ।।

अशा या चिरंतन जीवनमूल्यांचा अभ्यास होणे, ही आजच्या काळाची गरज निर्माण झाली आहे.

## निष्कर्ष

१) संत तुकारामांनी सुख हे विषयात नसतेच तर ते आत्म्याचे स्वरूप आहे. विषय भोगता भोगता मनुष्य संपतो; परंतु विषय संपत नाही. विषयच मनुष्याला संपवतो.

२) साक्षात्कार झाला म्हणजे चमत्कार करता येतात, अशी समजूत असंख्य लोकांची असते; परंतु चमत्कार करणारे सर्वच लोक साक्षात्कारी संत नसतात. संत तुकारामांनी चमत्कारी ढोंगी साधूंवर आपल्या अभंग वाङ्मयातून परखडपणे कोरडे ओढले आहेत.

३) साक्षात्कार झालेला व्यक्ती स्वत:ला आत्मा समजते, ती देह तादात्म्य टाकते. आत्मा जन्मत नाही व मरतही नाही. आत्मा अविनाशी आहे, असा तिचा दृढ समज होतो.

४) जीवनातील भरपूर सुख हे विषय भोगावर अवलंबून नाही, तर विषय हे मनुष्याला कधीही सुखी करू शकत नाहीत. त्यासाठी विषय नारायण झाले पाहिजेत. विषय अध:पातास कारणीभूत ठरतात, अशी पक्की खात्री पटते.

५) ज्याप्रमाणे पतंग दिव्यावर झडप घालतो व त्याठिकाणी त्याचा मृत्यू होतो, त्याप्रमाणे जो विषयाचरण करतो त्याचा आत्मघात ठरलेलाच आहे. साक्षात्कार झाल्यानंतर मनुष्यदेहाचे सर्वधर्म टाकून आत्म्याचे धर्म स्वीकारतो. अशाप्रकारे सर्वच विपरीत समजुतींचा नाश साक्षात्काराने होतो.

## संदर्भ

१) आंबिले, तुकाराम बोल्होबा – जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या अभंगाचा गाथा, श्री संत तुकाराम, चौथी आवृत्ती, प्रकाशक श्री संत तुकाराम महाराज संस्थान श्रीक्षेत्र देहू, पुणे, १ नोव्हे. २००४ पृ. क्र. १४५

२) कुलकर्णी, ज्ञानेश्वर विठ्ठल – श्रीज्ञानेश्वरी, वारकरी शिक्षण संस्था आळंदी (देवाची) पुणे, २००६. पृ. क्र. १२२

३) संत एकनाथ, पृ. क्र. १७७

४) तत्रैव, पृ. क्र. १६३

५) खंदारकर, शंकर महाराज. – श्रीअनु वामृतभाष्य, वै. शंकर महाराज खंदारकर विश्वस्त संस्था. उद्गीर १९९५.

❖❖❖

# सामाजिक शास्त्र संशोधनात शैक्षणिक ग्रंथालयाची भूमिका

डॉ. जी.पी. उरकुंदे
ग्रंथपाल
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

## प्रस्तावना

सामाजिक संशोधन ही बौद्धिक प्रकिया आहे. संशोधनामुळे उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा शोध घेऊन ज्ञानामध्ये भर टाकली जाते. उपलब्ध असलेल्या ज्ञानाचे पुन:परीक्षण केले जाते. आणि साहित्याची समीक्षा करून ज्ञानात भर टाकली जाते. संशोधन ही सतत चालणारी प्रकिया आहे. संशोधनाच्या संदर्भात Systematized effort to gain New Knowledge असे म्हटले जाते.

☐ शिक्षणाचा प्रसार आणि संशोधनामुळेच समाज, राष्ट्र आणि मानवाचा विकास होण्यास मदत होते. सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी शिक्षण आणि संशोधन या गोष्टी दोन्ही आवश्यक आहेत.

☐ शिक्षण आणि संशोधनाचे कार्य सफल होण्यासाठी वाचनीय साहित्य उपलब्ध होणे गरजेचे आहे. या गरजेतूनच ग्रंथालय आणि संशोधनाची निर्मिती झाली आहे. गरज ही शोधाची जननी होय. असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ग्रंथालये ही वाचनीय साहित्य उपलब्ध करून देशाबरोबरच ज्ञानाचे ग्रंथरूपाने जतन करत असतात. संशोधकाला संशोधन कार्यात मदत करणारी यंत्रणा म्हणून ग्रंथालये ही आधुनिक स्वरूपात कार्य करीत आहेत.

माहिती व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात बदलत्या घडामोडीचे आधुनिक तंत्रज्ञान संशोधकांना पुरविण्यासाठी ग्रंथालये सज्ज आहेत. सामाजिक संशोधनाद्वोर आधुनिक परिस्थतीची व संस्थेची परिपूर्ण ओळख करून देण्यासाठी ग्रंथालये ही समाजाभिमुख झाल्याचे दिसून येत आहे.

## सामाजिक शास्त्र संशोधनाची व्याख्या

सामाजिक संशोधन म्हणजे सामाजिक संशोधनाबाबत नवीन माहिती शोधण्यासाठी किवा जुन्या माहितीचे परीक्षण करण्यासाठी त्या ज्ञानातील अनुक्रम, परस्पर संबंध, कार्यकारण संबंध याविषयी स्पष्टीकरण व सामान्यीकरण प्रस्थापित करण्याची प्रक्रिया होय. – पी.व्ही.चंग

सामाजिक संशोधन ही सामाजिक जीवनाचे अध्ययन, विश्लेषण आणि संकल्पनी करण्याची एक पद्धत आहे. ज्यामुळे ज्ञानाची वृध्दी शुद्धीकरण किंवा पुनर्परीक्षण होऊ शकेल. मग ते ज्ञान एका सिद्धांतांची रचना करण्यास किंवा एका कलेस व्यवहारात करण्यास सहाय्यक ठरू शकेल. – स्लेसिंजट व स्टिफेनसन.

## सामाजिक संशोधनाचे उद्देश (Objectives of Social Science Research)

सामाजिक संशोधनाचा हेतू किंवा उद्देश, मानवी समाज मानवाचे समाजजीवन, त्यावर प्रभाव टाकणोर घटक आणि परिणाम यांच्याशी संबंधित असतो. सामाजिक संशोधनातून वेगवेगळ्या समस्यांचा अभ्यास केला जातो.

१. सामाजिक घटकांचा अभ्यास.
२. परस्पर संबंधाची उकल करणे.
३. नवनवीन ज्ञानाचा शोध घेणे.
४. जुन्या ज्ञानाची पुनर्मांडणी करणे.
५. सामाजिक जीवनकाळात नविन दृष्टिकोन अंगीकारणे.
६. सामाजिक नियंत्रण.

सामाजिक संबंध आणि प्रक्रिया, क्रिया आणि प्रतिक्रिया आणि विघटन प्रकृतीबाबत माहिती गोळा करणे, विश्लेषण करणे, प्रभावी उपाययोजना करणे आणि त्याद्वोर सामाजिक नियंत्रण प्रस्थावीत करण्यासाठी सामाजिक संशोधन उपयुक्त ठरते.

## संशोधन प्रक्रिया

संशोधन हे वेगवेगळया विषयाअंतर्गत चालू असणोर कार्य आहे. संशोधन हे शास्त्रीय पध्दतीने पूर्ण करण्यासाठी आणि संशोधनाचे निष्कर्ष हे संशोधनाच्या चौकटीतच राहण्यासाठी संशोधकाने संशोधन कार्य सरू करण्यापूर्वी संशोधन प्रक्रियेचा आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

संशोधनामध्ये Design या शब्दाचा अर्थ Drawing an outline or planning or arranging details असा घेतला जातो तर Research Design चा अर्थ **Planning a strategy of conducting research** असा आहे. संशोधन आराखडयामुळे संशोधनात सुसूत्रता निर्माण होते आणि संशोधन प्रक्रियेत गती प्राप्त होते. यासाठी संशोधन प्रक्रियेला महत्व प्राप्त झाले आहे.

## संशोधन प्रक्रियेतील महत्वाचे घटक

संशोधन ही अनेक टप्पे असणारी प्रक्रिया आहे. यामध्ये पुढील बाबीचा प्रामुख्याने समावेश करावा लागतो.

१. संशोधनाचा विषय
२. संशोधन संस्थेची निवड
३. संशोधनाची पार्श्वभूमी
४. संशोधनाचे उद्देश
५. संशोधनाची गृहितके
६. माहितीचे संकलन आणि विश्लेषण करणे.
७. अहवाल लिहिणे.

## संशोधनात ग्रंथालयाची भूमिका

आजच्या आधुनिक युगात सामाजिक संशोधनामध्ये संशोधन करीत असताना नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत गरजेचा झाला आहे. कठीण प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग संशोधकांनी करणे आवश्यक आहे. संगणकाचा वापर करून बऱ्याच माहिती व आकडेवारीचे वर्गीकरण, सारणीकरण करून विश्लेषण करावे लागते.

आजच्या आधुनिकतेच्या युगात ग्रंथालये व माहिती केंद्रे ही वाचनीय साहित्य विकसित करीत असतात. ग्रंथालये ही वाचन साहित्याच्या रूपाने संशोधकाना तसेच उपभोक्त्यांना गरजांची पूर्ती होईल अशी माहिती पुरवित असतात. ग्रंथालये ही संशोधकांना गुणवत्तापूर्ण वाचनीय साहित्याचा पुरवठा करत असतात. ग्रंथालयातील सेवा अधिक परिणामकारकपणे होण्यासाठी विविध स्तरावरील शैक्षणिक ग्रंथालये, उदा. महाविद्यालयीन ग्रंथालये, विद्यापीठ स्तरावरील ग्रंथालये, विशेष ग्रंथालये परिपूर्ण माहितीने सज्ज झालेली आहेत. ग्रंथालयात येणारा वाचक, संशोधक हा ग्रंथालयातून हवी असलेली माहिती मिळावी या अपेक्षेने येत असतो. यासाठी आधुनिक काळातील ग्रंथालयीन माहितीची साठवणूक करून संशोधकांना माहिती पुरविण्यासाठी सज्ज असली पाहिजेत. संशोधन हे कोणत्याही प्रकारचे असो त्या संशोधकांना उपयुक्त असलेली माहिती देणे हे ग्रंथालयाचे आद्यकर्तव्य आहे.

संशोधनामध्ये ग्रंथालयाची भूमिका ही महत्त्वपूर्ण आहे. संशोधक हा माहिती शोधण्यासाठी ग्रंथालयावरच अवलंबून असतो, त्यासाठी ग्रंथालयानी वाचनीय साहित्याचे वर्गीकरण करून वाचकांना/संशोधकांना माहिती उपलब्ध करून दिली जातात.

सामाजिक शास्त्र संशोधनात उपभोक्त्यांना परिणामकारकपणे सेवा देण्यासाठी ग्रंथालयात ई–बुक्स ही जर्नल, विश्वकोष, संदर्भ ग्रंथ इत्यादी माध्यमाचा समावेश असणे गरजेचे आहे. ग्रंथालयात कोणकोणत्या स्वरूपाची नियतकालीके आहेत, वर्तमानपत्रे आहेत, कॉन्फरन्स प्रोसिडींग आहेत याची संशोधकांना जाणीव करून देणे गरजेचे आहे. ग्रंथालयाने ग्रंथालयात असणारी सामाजिक शास्त्राविषयीची साधने संशोधकांना उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. पुढील बाबीसाठी ग्रंथालयात संशोधन करण्यासाठी आवश्यकता आहे.

१. माहितीची साधने विकसित करण्यासाठी.
२. संशोधकांना /उपभोक्त्याला परिपूर्ण माहिती मिळवून देण्यासाठी.
३. सिद्धंत तत्वे विकसित करण्यासाठी.

४. येणाऱ्या बदलास सामोरे जाण्यासाठी.

५. संशोधकात/उपभोक्त्यास असणोरे नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी.

## निष्कर्ष

सामाजिक संशोधन हे सामाजिक विकासाचे प्रेरणास्थान आहे. अज्ञान दूर करण्यासाठी, सामाजिक प्रगतीसाठी, सामाजिक कल्याणाकरीता, सामाजिक नियोजन व नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी सामाजिक संशोधन अतिशय महत्त्वाचे आहे. सध्याच्या युगात शैक्षणिक ग्रंथालये संशोधकांना विविध स्वरूपाची माहिती पटवून संशोधनाच्या कार्यात सतत मदत करीत आहेत. सामाजिक संशोधनात माहिती पुरवित असताना विविध माध्यमाचा वापर करून संशोधकांना, समाजात माहिती सेवा देण्याचे कार्य ग्रंथपालास करावे लागते. ग्रंथालयामध्ये माहिती साक्षरता सारखे अभियान राबवून वाचकांना, संशोधकाला माहिती पुरविण्याचे कार्य ग्रंथालये करीत आहेत. त्यामुळेचे सामाजिक शास्त्रासारख्या विस्तृत विषयात ग्रंथालयाची भूमिका फार महत्त्वपूर्ण आहे.

## संदर्भ सूची

1. Information competency standards for Higher education : Association of collage and Research Librarian 2000 Chicago

२. बोधनकर, सुधीर आणि अलोणी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन, नागपूर,–१३

३. कायंदे पाटील गंगाधर, संशोधन पध्दती, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक–१३

४. कुमार राजेंद्र, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे–२०१३.

❖❖❖

# स्वयंसहाय्यता बचत गटांना बाजारपेठ उपलब्धता

प्रा. माधुरी पंडीतराव राखुंडे
वाणिज्य अधिव्याख्याता
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

## प्रस्तावना

बाजारपेठ स्वयंसहाय्यता बचत गटांचा आत्मा असून बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळणे आवश्यक आहे. बचतगटातील प्रत्येक महिला सदस्याला एक कमावते साधन द्यावयाचे असेल तर तिला छोटी उद्योजिका बनवायची असेल तर तिच्या उत्पादित मालाला विपणन मिळणे आवश्यक आहे. स्वयंसहाय्यता बचत गटाच्या उत्पादित मालामध्ये कितीतरी महिलांच्या मायेचे हात फिरले आहेत. माल तयार करताना कितीजणींचे संस्कार घडलेले आहेत याचा विचार करून त्या संस्कारमय मालाला विपणन सुविधा मिळवून देणे आवश्यक आहे. कोणत्याही बाजारकेंद्रात स्वत:ची उत्पादने स्वत: विकून दाखविणे हा विपणन मिळण्याचा मार्ग असला तरी असा स्वयंप्रेरित मार्ग सर्वाना शक्य होईल असे नाही. कारण स्वयंसहाय्यता बचत गट प्रस्थापित वर्गापुढे टिकू शकणार नाही म्हणून शासनाच्या व स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून बचत गटांच्या वस्तूंचा विनणन प्रश्न निर्मुलन केल्यास, स्वयंसहाय्यता बचत गटांच्या चळवळीस निश्चित उभारी मिळू शकेल म्हणून स्वयंसहाय्यता बचत गटाने व शासनप्रणालीने विपणनाची निर्मिती पुढीलप्रमाणे करावी.

## स्थानिक बाजार

स्वयंसहाय्यता बचत गटाची प्रभागनिहाय, वाडीवस्ती, गावोगाव स्थापना होत आहे. या गटांनी गावांच्या गरजेनुसार उत्पादन केल्यास गटांना आपोआप स्थानिक गरजांचे सर्वेक्षण करून त्याप्रमाणे उत्पादन करावे, म्हणजे गटाने दैनंदिन लागणाऱ्या व शेतीसंलग्न वस्तूंचे उत्पादन केल्यास स्थानिक विपणन उपलब्ध होईल. उदा. गांडूळखत प्रकल्प, पिठाची गिरणी, गव्हांकुर रस, स्नॅक्सबार, पनीर, दही, ताक, चूल अशा कितीतरी वस्तूंचे उत्पादन केल्यास स्थानिक विपणन प्राप्त होऊ शकेल.

स्थानिक बाजारपेठांची निर्मिती करण्यास शासनाने प्रयत्न करावे. त्याकरिता प्रत्येक महसूली गावांत गटाकरिता भवन बांधण्याची तरतूद केलेली आहे. यामध्ये गटाकरिता गाळे उपलब्ध करून दिले पाहिजेत. तसेच ग्रामपंचायतीचे काही गाळे उपलब्ध करून दिल्यास गावातील जनतेला बचत गटाच्या वस्तूची कल्पना येईल. श्शासनाने या बचतगटांची उत्पादने काही प्रमाणात बाजारभावापेक्षा जास्त किंमतीला खरेदी करून, शासकीय लेबल लावून लेव्ही पध्दतीने विक्री केल्यास बचत गटांना हक्काची बाजारपेठ मिळून उद्योजक बनतील, म्हणून शासनाने ग्रामीण भागात जाणीवपूर्वक प्रयत्न करून बाजारपेठ उपलब्ध करता येईल.

## गटबाजार

काही गावे मिळून मध्यवर्ती भागात गटबाजार भरत असतो. त्यास आठवडीबाजार म्हणतात. या बाजारात आठवड्यातून एखादाच समुदाय खरेदी विक्रीस येतात. अशा विपणनाचे सर्वेक्षण करून त्या गावात शासनामार्फत विपणन केंद्रे निर्माण करावीत. या केंद्रामार्फत बचतगटांना कच्चा माल, सेवासल्ला मार्गदर्शन इ. सुविधा पुरविण्यात याव्यात.

गटबाजाराच्या पातळीवर शासनामार्फत शेतमाल विपणन व्यवस्था सहकारी तत्त्वावर उपलब्ध आहे. यासाठी नवीन यंत्रणा किंवा बाजार सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता नाही. या विपणन सहकारी संघात गटांच्या करिता विपणन केंद्रे निर्माण करावीत या केंद्रामार्फत इतर बाजारपेठांची माहिती व मार्गदर्शन मिळू शकेल. तसेच सहकारी विपणन संघाचे उत्पादन कमिशन तत्त्वावर बचतगटांना दिल्यास विपणनाची माहिती, कौशल्य गटांना प्राप्त होऊ शकेल. गटबाजारात एकमेकांच्या उत्पादनाची माहिती मिळून वस्तूंचे विनिमय करता येईल. त्यामुळे बाजारविस्तार होईल तसेच गरजेनुसार स्थानिक बाजारात उपलब्ध करता येईल. गटबाजार परिसरात खाजगी उद्योजक किंवा सहकारी उद्योग शेतीसंलग्न वस्तूंचे उत्पादन करीत असतील तर त्यांचे उत्पादन एजन्सी गटांना दिल्यास बाजार विस्तार होऊ शकतो. उदा. पशूखाद्य, कृषीसेवा, तेलधान्ये, रेशीमउद्योग, दुग्धजन्य पदार्थ, शेतीयुक्त रासायनिक खते यांची एजन्सी देण्यात यावी.

## तालुकाबाजार

तालुक्याच्या ठिकाणी मोठा बाजार भरतो, तसेच दैनंदिन स्वरूपात बाजार सुरू असतो. अशा विपणन गटांना याचा लाभ स्वबळावर मिळविता येत नाही. म्हणून शासनाने सहकाराप्रमाणे बचत गट उत्पादित मालाचा बाजार या नावाने विपणन भवन करावीत. या विपणनाची निर्मिती सहकार तत्त्वावर करून स्थानिक, गटबाजार यांच्याशी संलग्न करावीत. तसेच तालुक्यातील सर्व बचतगटांना सदस्यत्व देण्यात यावीत त्यामुळे बचतगटांना उत्पादन मार्गदर्शन अशी माहिती मिळू शकेल. तसेच तालुक्यातील बचतगटांनी उत्पादने एका छताखाली येतील, त्यांना तालुक्यातील ग्राहक मिळतील, म्हणून शासनाने तालुका पातळीवर सहकाराप्रमाणे बचतगट सहकारी विपणन संघ स्थापन करावेत या संघामार्फत बचतगटांना व्यवसाय मार्गदर्शन, परवाना, प्रकल्प आराखडा इ. सुविधा पुरविण्यात याव्या. तसेच तालुकासंघामुळे बचतगट जोडता येतील. त्यामुळे वित्तीय संस्थावर दबाव राहील. बॅक लिंकेज लवकर होईल. तसेच स्वयंसेवी संस्था कार्यक्षम राहतील.

तालुका पातळीवर खाजगी संस्था किंवा व्यक्तींनी मध्यम प्रमाणावरील मॉल निर्माण करून त्यामध्ये गटांचा माल विक्रीस ठेवल्यास गटांना व मॉल या दोघांना बाजारपेठ मिळू शकतील.

## जिल्हापातळीवर बाजार

बचत गटाच्या मालाचे संकलन करून जिल्हाबाजारात वितरण करून जिल्हा बाजार मिळविता येईल. त्याकरिता शासनाने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांतर्फे शहरात प्रभागनिहाय विक्री केंद्रे निर्माण केली पाहिजेत. सावित्री बझारांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्ह्यात विपणन भवन निर्माण करावीत. शहराच्या प्रभागात ग्राहकांचा जास्त वावर आहे तेथे विपणन केंद्रे उभारावीत. या केंद्रामार्फत ग्रामीण व शहरी उत्पादनांचे विनिमय करता येईल. त्याचप्रमाणे ग्रामीण बचतगस्वयंसहाय्यता बचत गटांना शहरात प्रवेश करण्याकरीता शासनामार्फत जिल्हा ठिकाणी तिमाही, सहामाही बचतगट प्रदर्शनी आयोजित करावीत. जेणेकरून मालाची जाहिरात होऊन खप वाढेल आणि बाजारपेठेचा विस्तार होईल. जिल्हाबाजारात सर्व गटांनी आपआपल्या उत्पादनाचे कमिशन तत्त्वावर परस्पर गटांना मालाचे विपणन करून जाळे गुंफता येईल.

जिल्हा पातळीवर शासकीय विभागासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू आणि सेवा बचत गटाकडून घेतल्यास विपणन जाळे निर्माण होईल. तसेच शासकीय विभागाने बचत गटांच्या उत्पादित वस्तू खुल्या बाजारभावापेक्षा जास्त किंमतीला खरेदी केल्यास गटांना मोठया उद्योगांशी स्पर्धा करण्याचे सामर्थ्य प्राप्त होईल. अलीकडच्या काळात जिल्हापातळीवर विशाल प्रमाणात मॉल संस्कृती आली आहे. मॉलमध्ये बचतगटांच्या वस्तूंची विक्री व्यवस्था केल्यास उच्च उत्पन्न गटात या वस्तूंचा खप वाढेल.

## राज्यपातळीवर बाजार

राज्यपातळीवर शासनातर्फे सरस सारखे मेळावे आयोजित करून मोठया शहरातील बाजारपेठा मिळविता येतील. परंतु सरससारखे प्रदर्शन एकाच शहरात, राज्यनिहाय आयोजित केल्यास राज्याराज्यात मालाची ओळख, गुणवत्त, कौशल्य, सामंजस्य इ. बाबी वृद्धिंगत होतील. तसेच एकात्मतेची बांधणी होऊन खऱ्या अर्थाने भारत निर्माण होईल. म्हणून राज्यशासनाने राजधानीच्या ठिकाणी बचतगट विपणन प्रणाली कायमस्वरूपी निर्माण करावी त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था शहराशी जोडली जाईल.

शासनाने राज्यपातळीवर सहकाराच्या तत्वाप्रमाणे बाजारपेठांचे जाळे निर्माण करण्यासाठी त्रिस्तरीय विपणन संघ निर्माण करून बचतगटांना सुनियोजित विपणन व्यवस्था निर्माण केली. अशा रचना पुढील प्रमाणे असावी.

केन्द्रीय विपणन संघ
↓
राज्य स्वयंसहाय्यता बचत गट विपणन संघ
↓
जिल्हा मध्यवर्ती स्वयंसहाय्य बचतगट विपणन संघ
↓

| ↓ | ↓ |
|---|---|
| विभागीय स्वयंसहाय्यता बचत गट विपणन संघ | गांवनिहाय विभागीय स्वयंसहाय्यता बचत गट विपणन संघ |

अशाप्रकारे विपणन व्यवस्था निर्माण केल्यास बचत गटांचा विकास होऊन ग्रामीण अर्थकारणाच्या विकासास हातभार लागेल, व ग्रामीण अर्थकारण मजबूत होईल.

## हंगामानुसार बाजार उपलब्धता

भारतामध्ये ऋतुमानानुसार बाजारपेठा उपलब्ध असतात. या बाजारपेठा स्वयंभू निर्माण होतात. अशा बाजारपेठा काबीज करण्याचे सुनियोजित गटांनी केले पाहिजे. ग्रामीण भागात सण, उत्सव, यात्रा तसेच लग्न समारंभ यांसारखे कार्यक्रम सतत सुरू असतात. प्रसंगानुरूप उत्पादनामध्ये विविधता निर्माण केल्यास हंगामी बाजारपेठा मिळू शकतात. प्रत्येक गावाचा आणि महोत्सवाचा विचार करून विविध वस्तूंची उत्पादने करून विक्री करावी.

भारतात हंगामानुसार सण आणि उत्सव येतात त्यानुसार बचत गटांनी उत्पादल केल्यास हुकमी बाजारपेठा मिळू शकतात. उदा. पोळ्याच्या सणाला बैलांच्या सजावटीला लागणारे साहित्य, तसेच मातीचे व लाकडाचे बैल तान्ह्या पोळ्यासाठी तयार करणे, मकरसंक्रांतीला तिळाच्या वड्या, तिळगुळ, भेटवस्तू, भेटकार्ड मागणीप्रमाणे तयार करणे. दिवाळीच्या वेळी आकाश कंदिल, दिवे, रांगोळ्या, सुगंधी उटणे, कापूर, अगरबत्ती, मेणाची दिवे तयार करणे, स्प्रे, अत्तर तसेच फराळाचे पदार्थ इ. सारख्या अनेक वस्तूंचे उत्पादन करावे. त्याचप्रमाणे मुस्लीम धर्मीयांच्या रमजान सणासाठी काजू, बेदाणे, शेवया इ. ची विक्री करावी. ख्रिसमससाठी स्टार दिवे, विविध प्रकारचे केक तयार करावेत. लग्नसराईच्या हंगामात लग्नाकरिता रुखवंत, वधुवरांचे बाशिंगे, मुंडावळ्या, अक्षतांचे पॅकींग यासारख्या वस्तू तयार करून विकता येतील. तसेच पावसाळ्यात बचत गटांनी नर्सरी तयार करून विविध प्रकारची रोपे तयार करून विक्री केल्यास बाजारपेठा उपलब्ध होऊ शकतील. तसेच उन्हाळ्यात वाळवणाचे पदार्थ उदा. धापोडे, कुरड्या, मुगवड्या, पापड, बटाटा चिप्स, सांडगे, मिरच्या तसेच हिवाळ्यात स्वेटर, मफलर विणणे तसेच नवजात बालकांसाठी दुपटी, लंगोट शिवून दवाखान्यात पुरविणे. जुन्या कपड्यांपासून पायपुसणे, चटया विणल्यास स्थानिक बाजारात मागणी वाढू शकते. अशा प्रकारे ग्रामीण भागात वस्तूंचे उत्पादन केल्यास स्थानिक बाजारपेठा तसेच राष्ट्रीय बाजारपेठा उपलब्ध आहेत. परंतु त्यांचा वापर करून घेण्यासाठी बचतगटांना प्रशिक्षण देण्याची आज गरज आहे.

## संदर्भ


१. प्रा. मुलाणी एम. यु. –महिला स्वयंसहाय्यता बचत गट –डायमंड पब्लिकेशन, पुणे

२. मासिक योजना

३. मासिक लोकराज्य

३. वृत्तपत्र कात्रणे


❖❖❖

# स्त्रीजाणिवेचा हुंकार : कमल देसाई आणि विजया राजाध्यक्ष

प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
एम.ए. मराठी, इतिहास, बी.एड., पीएच.डी., सेट
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
E mail: pavanmandavkar@yahoo.com भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५

## प्रस्तावना

कथा, गोष्ट हा प्रकार लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच भावणारा आहे. लहानपणी तर गोष्टींनी विशेष वेड लावलेले असते. अशा वेळी लहान मुलांना वळण लावताना आईने या छोट्या छोट्या गोष्टींचाच आधार घेतलेला असतो. त्यातून संस्काराचे बीज पद्धतशीरपणे ती आपल्या मुलांच्या मनात पेरत असते. आपल्या प्रत्येकाच्या बालमनातल्या आतल्या कप्प्यात या गोष्टी आपली जागा ठेवून असतात. म्हणूनच हे मूल मोठे झाले तरी त्याच्या मनातील गोष्टींचे आकर्षण लोप पावलेले नसते. 'आई साऱ्या मानवजातीसाठी आद्य कथनकर्ता असते. या अर्थाने या सृष्टीचक्रात जेव्हा केव्हा पहिल्यांदा गोष्ट सांगितली गेली असेल, तेव्हा ती स्त्रीनंच सांगितली असेल, पुरुषानं नव्हे. म्हणजेच कल्पित सृष्टीची आद्य रचनाकर्ता एखादी आईच असेल आणि ही गोष्ट अर्थातच मौखिक परंपरेतील असेल.' [१]

**बीजशब्द** : स्त्री, कथा, पुरुष, मराठी, आशय, लेखन, परिस्थिती, मर्यादा, तत्त्वज्ञान

## विषय विवेचन

स्त्री ही पहिली कथाकार असूनही संपूर्ण मराठी कथावाङ्मयाचा आढावा घेतला तर पुरुष कथाकारांच्या तुलनेत स्त्री कथाकारांचे लेखन मर्यादित स्वरूपाचे आहे. ही मर्यादा संख्यात्मक, गुणात्मक, विषयात्मक अभ्यासात्मक अशा सर्वच दृष्टींनी आहे. याचे कारण भारतातली स्त्री पुरुषांच्या जडणघडणीतली तफावत होय. पुरुषाचे लेखक असणे हा त्याचा विशेष गुण म्हणून गणला जातो. लेखन करताना तशी विशेष वागणूक त्याला मिळते. खोलीचे दार बंद करून तो नि:शंकपणे लेखनकार्यात गढून जाऊ शकतो. स्त्रियांना मात्र घरातील सर्व जबाबदाऱ्या पार पाडून आपल्या लेखनकार्याला वेळ द्यावा लागतो. त्यामुळे बरेच सुंदर विचार घरातल्या जबाबदाऱ्यांमध्ये वाहून जातात. अशा प्रतिकूल परिस्थितीत प्रतिकूल प्रतिक्रियांना तोंड देत स्त्रियांचे लिखाण होत असते. त्यामुळे स्त्रियांच्या लेखनातील विषयांना गुणवत्तेला मर्यादा पडणे स्वाभाविक आहे.

अशा कारणांमुळे सुरुवातीला लेखन क्षेत्र म्हणजे पुरुषांची मक्तेदारी होती. 'स्त्रीच्या भोवतालचे सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरण जसजसे बदलत गेले, शिक्षणविषयक सुविधा, संधी उपलब्ध होत गेल्या. विविध वाङ्मयप्रकारांमध्ये स्त्रियांनी लिहिलेलं साहित्य स्त्रीवादी दृष्टिकोनामुळे लक्षवेधक ठरले. साहित्य क्षेत्रात बहुसंख्य स्त्रियांनी स्वत:चे अस्तित्त्व सिद्ध केले. आणि स्त्रीवादी साहित्याचा नवा प्रवाह निर्माण झाला. त्यातून स्त्रीच्या बदललेल्या आयुष्याचा वेध घेतला जाऊ लागला.[२] या पार्श्वभूमीवर मराठी कथासाहित्यात अशा अनेक स्त्री कथाकार होवून गेल्या आहेत. त्यांचा उल्लेख साहित्यात पुरुषी सत्तेला आव्हान देणाऱ्या कथालेखिका असा करावा लागेल. या कथालेखिकांनी आपल्या स्त्रीसुलभ मर्यादांवर मात करून जीवनाचा व्यापक आशय आपल्या कथांमधून मांडला आहे. गुणात्मकदृष्ट्या या स्त्रियांच्या कथा अत्यंत दर्जेदार होत्या. आशय अभिव्यक्तीच्या बाबतीत त्यांची क्षितिजे विस्तारलेली दिसतात. अशाच साहित्यक्षेत्रात पुरुषी वर्चस्वाला आव्हान देणाऱ्या दोन कथालेखिका म्हणजे कमल देसाई आणि विजया राजाध्यक्ष होय.

## कमल देसाई

कमल देसाई या मराठी साहित्यातल्या एक ज्येष्ठ लेखिका. अत्यंत व्यासंगी असणाऱ्या कमलताईंचे तत्त्वज्ञानावर विशेष प्रभुत्व होते. कमल देसाई या महाराष्ट्र – कर्नाटक सीमेवर बेळगाव आणि धारवाड गावाकडच्या. बालपण, शालेय शिक्षण येथेच झाले. कथा, नाटके, कविता, अनुवाद असे विविधांगी लेखन त्यांनी

केले. त्यांची कथा विशिष्ट साच्याने बनलेली नाही. त्या पूर्णत: भारतीय असल्या, भारतीय संस्कृतीशी त्यांचे जवळचे नाते असले तरीही स्वातंत्र्य, बंडखोरी, प्रयोगशीलता, आधुनिकता अशा वैशिष्ट्यांनी परिपूर्ण कथा त्या लिहितात. भारतीय स्त्रियांच्या अनुभवविश्वाच्या मर्यादा कमल देसाईंच्या बाबतीत दृष्यमान होत नाहीत, याचे कारण कुठेतरी त्यांच्या वैयक्तिक आवडीनिवडीत लपलेले असावे. त्यांना तत्त्वज्ञानात जितका रस होता तितकाच सौंदर्यशास्त्र, हास्यकला, सामाजिक शास्त्राचे चित्रपट, नाटके, या विषयाचे चौफेर ज्ञान त्यांना होते. भारतीय संस्कृती आणि पाश्चात्य परंपरा यांचा सुरेख मेळ त्यांच्या कथांमध्ये दिसतो. 'मानवी जीवनाच्या प्राताताच विणले गेलेले आध्यात्मिक आणि अधिभौतिक प्रश्न हाताळणाऱ्या फँटसी, स्वप्ने आणि जाणीव–नेणीव यांच्या खेळातून आणि स्वत:च्या प्रतिमेचा शोध घेणाऱ्या एकमेव लेखिका म्हणून कमल देसाईंचा निर्देश करावा लागेल.'[३] कमल देसाई यांचा कथेविषयीचा दृष्टिकोन स्पष्ट आहे. त्यांच्या मते, गोष्ट कुठेही घडते आणि कशीही घडते. प्रत्येक क्षण हा तुमच्या मनात एक गोष्ट घडवित असतो. अशी कथेविषयीची त्यांची संकल्पना असल्यामुळे कथाविष्कार त्यांना सहज साधा सोपा वाटतो. म्हणूनच मोठमोठं तत्त्वज्ञान आपण कथेच्या माध्यमातून रसिकांपर्यंत सहजपणे पोचवू शकातो. असा त्यांना विश्वास आहे. आणि त्यांच्या कथा पाहिल्या तर हा विश्वास अनाठायी नाही हेही लक्षात येते.

कमल देसाई यांच्या अनेक कथाचा आढावा घेतला तर त्यानी सखोल असे तत्त्वज्ञान आपल्या दृष्टीकोनातून मांडून वाचकाला नवी दिशा दिली आहे. उदा 'मोडका बाजार', या कथेत जो त्यांनी सजीव निर्जीवातला भेद नष्ट करून त्यांच्यात अंतरक्रिया घडवून आणली आहे. त्यातून सृष्टीबददलचं सम्यक ज्ञान त्या हळुवारपणे उलगडतात. 'रंगत्रयी' कथेत कलाकाराचा कलाविष्कार आणि त्यांचा स्वशोध ही प्रक्रिया पाहावयास मिळते. मानवी अस्तित्व, जाणीव–नेणिवेतले हिंदोळे, स्वप्न, फँटसी हे सगळे विशेष त्यांच्या 'तिळाबंद' या कथेत दिसतात. 'महादेववाडी' कथेतील प्रयोगशीलता म्हणजे मुख्य कथनकर्त्याऐवजी अन्य पात्रांकरवी विविध पातळ्यांवर कथा फुलविणे. 'प्लास्टीकचे विश्व' या कथेतून त्याचा मिथकांबद्दलची आस्था पहावयास मिळते. मिथकीय व्यक्तिरेखा त्यातील कथासूत्रे यांच्याशी एकात्म स्वरूपाचा सहबंध प्रस्थापित करून त्यांना विस्तारित अवकाश प्राप्त करून देण्याचा प्रयत्न कमल देसाई या कथेतून करतात. कमल देसाई यांची 'श्राद्ध' ही कथा कुटुंबकथेचा चेहरा घेऊन अवतरलेली असली तरीही माणसाच्या आयुष्यातील अनेक विरोधात्म पैलू दर्शविणारी आहे. 'आठ वर्ष', 'आत्मा विकणे आहे', 'माणसाची गोष्ट', 'हॅट घालणारी बाई', 'भेट' अशा अनेक कथांनी इतके विविध विषय आणि दृष्टिकोन कमल देसाई यांनी पुढे आणले की, त्यावरून त्यांची जीवन जाणीव किती व्यापक, प्रगल्भ होती हे लक्षात येईल.

## विजया राजाध्यक्ष

पन्नास वर्षांच्या वर सातत्याने लेखन करणाऱ्या विजया राजाध्यक्ष म्हणजे कथाक्षेत्रातलं एक महत्त्वपूर्ण नाव. प्रामुख्याने स्त्रियांचे विश्व निर्माण करून कथाविश्वाला समृद्धी आणणारया विजयाताई कथालेखिका म्हणून बहुरंगी बहुढंगी आहेत. बरीच वर्षे लेखनक्षेत्रात राहिल्यामुळे त्यांच्या लिखाणातून विविध कालखंडात झालेली स्त्रीजीवनातील विविध स्थित्यंतरे अत्यंत समर्पकपणे प्रगटतात. वेगवेगळ्या वयाच्या निरनिराळ्या भूमिकांमधून वावरणाऱ्या, सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या स्त्रिया रेखाटून त्यांनी स्त्रियांची प्रत्येक बाजू आपल्या लेखनात उजळ केली आहे. विजया राजाध्यक्षांनी कधी कोणत्याही एका विचारप्रणालीचा आधार घेतला नाही. त्यांची लेखणी विविध विचारतरंगातून विहरत राहिली.

स्त्रीचे मुख्य वेगळेपण म्हणजे तिची निर्मितीक्षमता यांचे कुतूहल आदिम काळापासून मानवाला आहे. अनेक संशोधनानंतरही अनेक अज्ञात रहस्ये दडलेली आहे. याच रहस्यांचे आकर्षण विजयाताईंना वाटत आले आहे. त्यांच्या कथांमधील रूपबंधातून त्यांचे हे आकर्षण बरेचदा डोकावते. मानवाच्या जन्मासोबतच मृत्यू, वृद्धत्व, एकाकीपण यांचा शोधही त्यांना सातत्याने घ्यावासा वाटतो. पन्नास वर्षांपासून मध्यमवर्गीय जीवनाचा एक सामाजिक, सांस्कृतिक लेखाजोखा विजया राजाध्यक्ष यांच्या कथांतून मांडलेला आहे.

विजया राजाध्यक्षांच्या कथांचा आढावा घेतला तरीही त्यातून त्यांच्या विषयांची विविधता लक्षात येते. स्त्रियांचेच अनुभवविश्व साकारत असतानाही त्यांची चाकोरीबाहेरची वाट चोखाळली होती. 'विदेही'सारखी कथा वाचली तरी विजयाताईंच्या लेखनाची गहनता लक्षात येते. 'विदेही ही आशयघन, लालित्यपूर्ण, व सखोल अशी कथा आहे. लेखिका सुबक, रेखीव शैलीतून प्रकृती पुरुष नात्याची अथांगता, कलात्मकता, ताटस्थ्याने चित्रीत करीत जाते. कथा वाचून संपविल्यावर प्रश्न पडतो, ही कथा कोणाची? स्त्रीची की पुरुषाची? ही कथा किंवा पुरुष

कोणाही एकाची नसून दोघांचीही आहे. आलेल्या अनुभूतीचे मुक्त चिंतन एका कलात्मक पातळीवर कथारूप धारण करते. कथेतील व्यक्तींना कोणतेही विशिष्ट लिंग ठरविता येत नाही. किंबहुना तसा शोध घेणेही गौण आहे.[४]' 'कमळ' यासारख्या कथा यांतून स्त्रियांचे नावीन्यपूर्ण भावविश्व त्यांनी निर्माण केले. पूर्वसूरींपेक्षा धीट अभिवृत्ती त्यानी कथांतून साकारल्यावर पुढच्या स्त्रीसाहित्याच्या पांथस्थांसाठी एक पायवाट निर्माण केली. लैंगिक सुखाचा टप्पा ओलांडल्यानंतर ज्या रहस्याचे आकर्षण विजयाताईंना आहे, त्या मातृत्वाच्या अनुभवाला सामोरी जाणारी स्त्री मातृत्वाच्या आपल्या देहाकडे निर्मितीसाठीचे साधनरूप म्हणून बघताना सखोलतेने तिच्या मनातील विचारलहरी त्या अचूकपणे मांडतात. विजयाताईंना स्त्रीविचारांबरोबरच परंपरेचेही आकर्षण आहे. भारतीय संस्कृती, संस्कार त्यातील एकत्र कुटुंबव्यवस्था, या कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीचे स्थान अशा विविध अंगांनी त्या परंपरांचा विचार करतात. म्हणुनच पारंपरिक कौटुंबिक परिघात राहूनही त्या बंधनामध्ये मानवी नात्यांचे सौंदर्य कसे उजळून निघते हे त्यांच्या 'वर्तमान' आणि 'निर्वाण कथेतून आपल्याला जाणवते. परंपरांचा मनावर खोल पगडा असल्यामुळे १९६७ साली 'सत्यकथा'मध्ये प्रकाशित झालेली 'जेहत्ते कालाचे ठायी' ही कथा पारंपरिक हरदासी आख्यानाचा फॉर्म त्या आधुनिक रूपात मांडतात. 'संधिकाल' या कथेतून 'स्त्री–पुरुषांच्या सहजीवनाचे आधुनिक रूप दाखवितानाच, त्यातील कंगोरे, चढउतार, परस्परांमधील नाते समजून घेण्याची ओढ आणि मग स्वच्छपणे जाणवलेले सत्य स्वीकारण्याची तयारी याचा मनोज्ञ आलेख मांडते.'[५] 'अंधाराचा अर्थ', 'अनपढ', 'कमळ', 'नकोच', 'जानकी देसाईचे प्रश्न', 'षोडशी', 'भास', ' कडा', 'पश्चिम' अशा अनेक कथा विजयाताईंचे लेखनाचे विविध पैलू दर्शवितात.

## तुलना

कमल देसाई आणि विजया राजाध्यक्ष ह्या दोघीही मराठी कथा साहित्य विश्वातील एक वेगळी विचारधारा घेऊन अवतरलेल्या लेखिका होत. कमलताईंच्या मते कथालेखन ही एक सहजपणे घडणारी प्रक्रिया आहे. म्हणजे कथा ही आपल्या आजूबाजूला सतत घडत असते. प्रत्येक क्षण आपल्या मनात सतत कथा घडवत असतो. तो क्षण पकडणं हे प्रत्येकाला शक्य होत नाही. पण एखादे संवेदनशील मन हे क्षण लेखणीत कैद करतात, आणि कथेचा जन्म होतो. विजयाताईंना कथा लिहिताना विविध विचारतरंग प्रवृत्त करतात. वेगवेगळ्या वयाच्या निरनिराळ्या भूमिकांमध्ये वावरणाऱ्या स्त्रिया या विजयाताईंच्या कथा लिखाणाचे मुख्य केंद्रबिंदू होय.

या कथासृष्टीत जेव्हा केव्हा पहिल्यांदा कथा सांगितली गेली असेल ती एखाद्या स्त्रीनेच सांगितली असेल असे म्हटले जाते. या अर्थाने स्त्री ही आद्य रचनाकर्ती आहे. कमल देसाईंच्या लिखाणात हा आद्य रचनाकर्तीचा सूर दिसतो. म्हणजेच ही कथा आपल्या मानव इतिहासाच्या जवळ जाणारी आहे. विजयाताईंचे लिखाण हे स्त्रीजीवनातील विविध रहस्ये उलगडण्यात गुंतलेली आहेत. धीट अभिव्यक्तीसाठी विजयाताईंनी विदेही कमळ यांसारख्या कथा लिहिल्या असल्या तरीही त्यांचे मूळ मातृत्वाचे लेखन करण्यासाठी आसुसलेले होते. लैंगिक सुख आणि मातृत्व यांचा परस्पर संबंध असला तरी स्त्रीच्या मनातील या दोन्हींविषयीचे वेगळे संदर्भ याचे विजयाताईंना आकर्षण वाटते.

कमल देसाई यांना तत्त्वज्ञानाची फार आवड होती. त्यांच्या कथांना एक सहजतेचे प्रवाहीपण असले तरी त्याला आतून अविरतपणे तत्त्वज्ञानाचा पाझर फुटलेला होता. त्यांच्या अनेक कथांमधून हा ओढा व्यक्त होतो. विजयाताईंचे लेखन तत्त्वज्ञानापेक्षा आत्मशोधकेंद्रित दिसते. हा आत्मशोध विशेषत: स्त्रीच्या आत्मभानाशी निगडित आहे. विजयाताई स्वत: स्त्री असल्याने तिच्या वेदना, मर्यादा, गरजा, सामर्थ्य, संवेदनशीलता, आत्मसन्मान याअंगाने त्यांची कथा फुलते.

कमलताई आणि विजयाताई यांच्या कथांची काही बाबतीत साम्यस्थळे दिसतात. कमलताई यांची 'तिळाबंद' ही कथा आणि जानकी देसाईचे प्रश्न ही विजया राजाध्यक्षांची कथा स्त्रीच्या 'स्व'त्वाशी निगडित अनुभव मांडणाऱ्या आहेत. कमलताई यांची 'श्राद्ध' ही कथा आणि संधिकाल ही विजया राजाध्यक्ष यांची कथा पुरुषकेंद्री धर्मव्यवस्था– समाजव्यवस्था दर्शविणाऱ्या आहेत. कमल देसाई यांची अर्थ आणि विजया राजाध्यक्ष यांची वर्तमान या कथा स्त्रीचे द्वंद्वात्मक अनुभव मांडणाऱ्या आहेत. अशी अनेक उदाहरणे या दोन्ही कथालेखिकांच्या बाबतीत देता येतील जेथे त्यांचे मूळ विचार पातळी समांतर असल्याचे जाणवते.

सिमोन द बोव्हुआर यांच्या 'द सेकंड सेक्स' या पुस्तकात निष्कर्षरूपात एक महत्त्वाचे विधान आहे. 'स्त्रीला मुक्त करणे याचा अर्थ तिला पुरुषाबरोबर एकाच नात्यात जखडून न ठेवता तिला बहुरंगी नाती प्रस्थापित करण्याचे स्वातंत्र्य देणे. स्त्रीला तिचे स्वतंत्र अस्तित्व मिळू द्या. तसे झाल्यास ती स्वत:साठी तर जगेलच, पण

पुरुषासाठीही जगणे बंद करणार नाही. स्त्री पुरुष दोघेही एकमेकांना क्रियाशील अस्तित्व मानू लागतील व त्याच वेळी एकमेकांसाठीही उरतील.'[६] अशा प्रकारचे विचार दोन्ही कथालेखिकांच्या कथांमधून स्त्रवलेले आढळतात.

## निष्कर्ष

१. कल्पित सृष्टीची आद्य रचनाकर्ता एखादी आईच असेल आणि ही गोष्ट अर्थातच मौखिक परंपरेतील असेल.

२. स्त्री ही पहिली कथाकार असूनही संपूर्ण मराठी कथावाङ्मयाचा आढावा घेतला तर पुरुष कथाकारांच्या तुलनेत स्त्री कथाकारांचे लेखन मर्यादित स्वरूपाचे आहे.

३. या पार्श्वभूमीवर मराठी कथासाहित्यात अशा अनेक स्त्री कथाकार होऊन गेल्या आहेत. त्यांचा उल्लेख साहित्यात पुरुषी सत्तेला आव्हान देणाऱ्या कथालेखिका असा करावा लागेल. उदा. कमल देसाई आणि विजया राजाध्यक्ष.

४. कमल देसाई यांना तत्त्वज्ञानात जितका रस होता तितकाच सौंदर्यशास्त्र, हास्यकला, सामाजिक शास्त्राचे चित्रपट, नाटके, या विषयाचे चौफेर ज्ञान त्यांना होते. भारतीय संस्कृती आणि पाश्चात्य परंपरा यांचा सुरेख मेळ त्यांच्या कथांमध्ये दिसतो.

५. कमल देसाई यांच्या अनेक कथांचा आढावा घेतला तर त्यांनी सखोल असे तत्त्वज्ञान आपल्या दृष्टीकोनातून मांडून वाचकाला नवी दिशा दिली आहे.

६. 'मोडका बाजार', 'रंगत्रयी', 'तिळाबंद', महादेववाडी', 'प्लास्टीकचे विश्व श्राद्ध', 'आठ वर्ष', 'आत्मा विकणे आहे', 'माणसाची गोष्ट' 'हॅट घालणारी बाई,' 'भेट' अशा अनेक कथांनी इतके विविध विषय आणि दृष्टिकोन कमल देसाई यांनी पुढे आणले की, त्यावरून त्यांची जीवन जाणीव किती व्यापक, प्रगल्भ होती हे लक्षात येईल.

७. पन्नास वर्षांच्या वर सातत्याने लेखन करणाऱ्या विजया राजाध्यक्ष म्हणजे कथाक्षेत्रातलं एक महत्त्वपूर्ण नाव. प्रामुख्याने स्त्रियांचे विश्व निर्माण करून कथाविश्वाला समृद्धी आणणाऱ्या विजयाताई कथालेखिका म्हणून बहुरंगी बहुढंगी आहेत.

८. भारतीय संस्कृती, संस्कार त्यातील एकत्र कुटुंबव्यवस्था, या कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीचे स्थान अशा विविध अंगांनी विजयाताई परंपरांचा विचार करतात. म्हणूनच पारंपरिक कौटुंबिक परिघात राहूनही त्या बंधनामध्ये मानवी नात्यांचे सौंदर्य कसे उजळून निघते याचे त्या यथार्थ वर्णन करतात.

९. कमलताई आणि विजयाताई यांच्या कथांची काही बाबतीत साम्यस्थळे दिसतात. कमलताई व विजयाताईच्या कथांमध्ये स्त्रीच्या 'स्व'त्वाशी निगडित अनुभव मांडणारे, पुरुषकेंद्री धर्मव्यवस्था– समाजव्यवस्था दर्शविणारे स्त्रीचे द्वंद्वात्मक अनुभव मांडणारे अनेक प्रसंग दिसतात. अशी अनेक उदाहरणे या दोन्ही कथालेखिकांच्या बाबतीत देता येतील जेथे त्यांचे मूळ विचार पातळी समांतर असल्याचे जाणवते.

## संदर्भ


१. आर्वीकर, संजय, 'सहा दशकांच्या समृद्धीची गोष्ट', स्त्री–लिखित मराठी कथा (१९५० ते २०१०) संपा. अरुणा ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, २०१४ पुणे, प्रथमावृत्ती, पृ. बारा.

२. देवरी, प्रा. डॉ. लीलावती, 'मराठी साहित्यात महिला स्त्रीवादी दृष्टीने एक आकलन', स्त्री अभ्यासाच्या दिशा, संपा. – डॉ. सुनंदा अहिरे, प्रा.डॉ. उषा य. साळुंके, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, २०१२, पृ. ९८

३. ढेरे, अरूणा (संपा.), 'कमल देसाई', स्त्री–लिखित मराठी कथा (१९५० ते २०१०), पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१४, पृ. ६३

४. चवरे, डॉ. रा.गो., 'नवकथेचा मध्यान्ह', मराठी कथा : प्रवृत्ती आणि प्रवाह, सुयश प्रकाशन, पुणे, २००३, पृ. १९०

५. आर्वीकर, संजय, 'सहा दशकांच्या समृद्धीची गोष्ट', उनि. पृ. २०.

६. सिमोन द बोव्हुआर, द सेकंड सेक्स, अनुवाद : करुणा गोखले, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१०, पृ ५५८.

## संदर्भग्रंथ


१. अदवंत, म.ना., मराठीतले काही कथाकार, अनमोल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७०
२. धोंगडे, अश्विनी, स्त्रीवादी साहित्य व समीक्षा, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जुलै– सप्टें. अंक २५८
३. पुरोहित, के. ज. (संपा.), सुधा जोशी, 'मराठी कथा : विसावे शतक', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, २००४
४. फडके, डॉ. भालचंद्र, मराठी लेखिका–चिंता आणि चिंतन, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८०
५. वरखेडे, मंगला, स्त्रियांचे कथालेखन : नवी दृष्टी, नवी शैली, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००५
६. शेवडे, डॉ. इंदुमती, मराठी कथा उगम आणि विकास, सोमैया, मुबई, प्र. आ., १९७३
७. साळुंखे, आ.ह., हिंदू संस्कृती आणि स्त्री, लोकवाङ्मय गृह, मुंबई, दहावी आवृत्ती, २०११


❖❖❖

# प्रादेशिक कांदबरीची काही वैशिष्ट्ये

प्रा. अतुलकुमार सारडे
सहा.प्राध्यापक
जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा,
जि.यवतमाळ, भ्रमणध्वनी ९३७१४१२३६

मराठी साहित्य लेखनातील कादंबरी प्रकाराची चर्चा खूप झालेली आहे. कादंबरी लेखनाच्या आरंभापासून ते आजपर्यंत त्यात घडलेल्या स्थित्यंतराचे अनेक पद्धतीने विपुल लेखन अस्तित्वात आहे. मराठी कादंबरीच्या बदलत्या प्रकारानुसार तिची नेहमीच चर्चा होत राहिली आहे.

मराठी कादंबरीच्या क्षेत्रात १९६० नंतर जशी ग्रामीणतेची चर्चा जोमात रंगली व ग्रामीण वाङ्मयलेखनही भरपूर झाले. त्यामधीलच सुटलेलाच धागा किंवा त्यांचे विस्तारलेले स्वरूप 'प्रादेशिकता' होय, कदाचित, ग्रामीणता हा प्रादेशिकतेमध्ये सामावल्या जाणारा एक भाग आहे, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

मराठी कादंबरीच्या इतिहासात १९२५ नंतर लेखन झालेल्या कादंबरीकारांच्या कादंबरीलेखनातून प्रतिबिंबित झालेल्या प्रादेशिक वैशिष्ट्यांचा या शोधनिबंधातून आढावा घेण्याचा प्रयत्न मी करत आहे. हा प्रयत्न संशोधकांच्या स्तरावर निकषानुरूप कदाचित नसेल परंतु संकल्पनात्मक, आस्वादात्मक पद्धतीचा निश्चित आहे.

## निसर्ग आणि भू–प्रदेश

Though bhang, charas, and ganja all are hallucinogens and produce hallucinations or fantasies which are non-existent images. For example, sadhus who mostly use these substances claim to have seen God and describe the figure of God according to their own imaginations which does not resemble to anything existing.

## Prevention of Drug Abuse

There is only one surest protection against drug abuse and that is “take drugs only when prescribed by a doctor, only in prescribed dosage for the duration and in the manner as advised by the doctor." Other suggestions include **-** Do not use drugs as a crutch to fight your helplessness to solve problems. Avoid company of friends who insist that you take drugs to be accepted as a member of the group.

### Effect of Drugs on Individual

Drug dependence is one of the most serious health problems of youth. This results in gradual deterioration of physical, mental, moral, and social condition of the abuser which includes:

Lack of interest in studies, sports and other activities of life except in procuring and abusing drugs, Pessimistic and rebellious attitude towards parents, teachers and society in general.

Impairment of intelligence, memory, and body coordination, Loss of appetite for food leading to malnourishment and decrease in body resistance to disease, Damage to brain cells, Inability to face realities of life, Indulgence in crime, Contracting deadly diseases like AIDS, Hepatitis B and Hepatitis C in case of those who inject drugs and share syringes and needles, Getting involved in accidents, Tendency to commit suicide and homicide.

## Effect of Drugs on Family

A drug abuser is always in need of money compelled by physical or psychological dependence on drugs or both. The need for money increases as the abuser develops tolerance. When normal means to get money from parents get exhausted, he starts stealing things from home to finance his habit. Because parents in the beginning are not aware of his habit it is either the maid or children of neighbours who are suspected of stealing until the truth is discovered.

Parents become hostile to the abuser which further pushes him deep into the habit. He may start stealing things from houses of his neighbours and when caught becomes a source of great embarrassment for the parents and more so when neighbours one day find about his habit of abusing drugs.

His companions also become a cause of concern for parents. When they object to their visits to him he starts living outside the home with them for days and weeks. For pursuing his habit he may start selling drugs Concept of Health Educ1 to others and indulge in other petty crimes. Many a time he may be caught by police parents may have to visit police station him released. This may further cause embarrassment and also monetary Ionsto

parents for they may have to pay to get him released and also to pay compensation to the victims of crime committed by him.

Many a time they get involved in causing, accidents, committing robberies, rape even murders and parents have to s money fighting court cases. Family is lo down by neighbours. In case they are caught under drug trafficking act either selling dl or merely being in possession of drugs may languish in jail for almost 10 years.

Heavy and prolonged dependency drugs makes them malnourished extremely weak and their living conditions make them susceptible to many infections tuberculosis, tetanus, malaria, and jaundice In case they are injecting drugs and shat contaminated syringes and needles they may contract deadly diseases like AIDS & Hepatitis B or Hepatitis. In any case pare have to bear the sight and pain of children wasting away and slot approaching death helplessly and spend their hard earned money in the false hop of saving them, paying for their neglect in l proper bringing up, care and control.

## Conclusion

Youths are future hope of any society but drugs play a devastating role in crumbling this hope by destroying this potential. If youth becomes prey to the menace of drug abuse they neither take any interest in protect and promoting their health or pursue education or any occupation. Instead being an asset to the society for all the development and progress they become a liability and even the threat to the existence of the society.

## Reference

1. Berlioux, M. (1969) Doping, Drugs and Sport Newsletter, October, No. 25, p. 561-564
2. Bryson, L. Sport, Drugs and the Development of Modern Capitalism. Sporting Traditions, May, No. 2, p. 135-153
3. Campos, D.R., Yonamine, M. and de Moraes Moreau (2003) Marijuana as Doping in Sports. Sports Medicine, 33(6): 395-399
4. Moorcroft, D. (1985) Doping: The Athlete’s View: Dilemmas and Choices. Olympic Review, October, No. 216, p. 634-636
5. Mottram, D.R. (ed.), (2003), Drugs in Sport. 3rd Edition, Human Kinetics, Champaign, Illinois.
6. Paddick, R.J. (1990) Drugs and Sport: A Review Article Sporting Traditions, May, No. 2, p. 64-72
7. Schneider, A.J. (1992) Harm, Athletes’ Rights and Doping Control. Proceedings. First International Symposium for Olympic Research, February, 1992, p. 164-175.
8. World Anti-Doping Agency (2004) The 2005 Prohibited List: International Standard.

❖❖❖

# स्वातंत्र्योत्तर साठपूर्व वैदर्भीय कादंबरीतील सामाजिक जाणिवा

डॉ. पवन मांडवकर
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
अध्यक्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
E mail: pavanmandavkar@hotmail.com भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८

## सारांश

बा.सं. गडकरी यांनी १९०९ मध्ये 'सुधारणेचा मध्यकाल' ही सामाजिक कादंबरी लिहून खऱ्या अर्थाने वैदर्भीय मराठी कादंबरीची सुरुवात केली. स्वातंत्र्योत्तर साठपूर्व कालखंडात ना.रा. शेंडे, भाऊ मांडवकर, ग.त्र्यं. मांडखोलकर, पु.भा. भावे, पु.य. देशपांडे, वरखेडकर, मुक्तिबोध, उद्धव शेळके, दिनकर देशपांडे, महाजन, भोळे, टोंगो अशा अनेक नामवंतांनी सामाजिक जाणिवांनी परिपूर्ण कादंबरीलेखन केले. ना.रा. शेंडे यांची 'काजळी रात्र', 'तांबडा दगड', भाऊ मांडवकरांची 'माझी चाळीस भावंडं', पु.भा. भावे यांची 'अकुलिना', ग.त्र्यं. मांडखोलकरांची 'अनघा', शरच्चंद्र मुक्तिबोधांची 'क्षिप्रा', उद्धव शेळक्यांची 'धग' आणि 'नांदते घर' अशा काही सामाजिक जाणिवांच्या कादंबऱ्यांचा उल्लेख अपरिहार्यपणे करावा लागतो. स्वातंत्र्योत्तर साठपूर्व या तपात आलेल्या वैदर्भीय कादंबऱ्यांचे विषय स्वातंत्र्य चळवळीच्या आणि घडून गेलेल्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर होते. एकीकडे गांधीवाद, मार्क्सवाद आणि कौटुंबिक, सामाजिक जीवनावर होत गेलेले विविध प्रभाव आणि अशा अनेक समस्यांपासून दूर जाऊन रंजनवादाकडे लेखण्या वळल्या. त्यातूनच अनेक कादंबऱ्यांमध्ये कमीअधिक प्रमाणात सामाजिक जाणिवा प्रगट होत गेल्या. या सामाजिक कादंबऱ्यांच्या पुनर्अध्ययनाची गरज आज निर्माण झाली आहे.

## बीजशब्द

वैदर्भीय, सामाजिक, जाणिवा, स्वातंत्र्योत्तर, साठपूर्व

## प्रस्तावना

साधारण: इ.स. १९०० नंतर वैदर्भीय कादंबरीक्षेत्रात आशावादी व चैतन्यमय चित्र दिसू लागले. विदर्भाचे ह.ना. आपटे म्हणून ओळखले जाणाऱ्या बा.सं. गडकरी यांनी १९०९ मध्ये 'सुधारणेचा मध्यकाल' ही सामाजिक कादंबरी लिहून खऱ्या अर्थाने वैदर्भीय मराठी कादंबरीची सुरुवात केली. पुढे त्यांनी 'दुर्दैवी प्रेमयोग', 'पातितेचे हृदय', 'पुष्पमाला', 'विद्वान सोबती की कुशल गृहिणी' अशा अनेक कादंबऱ्या लिहिल्या. विशिष्ट सामाजिक समस्यांची मांडणी, त्यातून आदर्श मार्ग काढणे ही त्यांची पद्धत होती. 'विदर्भाने मराठी साहित्याला अनेक मोहरे दिले. काही खूप गाजले, काही कमी गाजले. कै.ग.त्र्यं. मांडखोलकर व कवी अनिल या दोन वैदर्भीय लेखकांना सबंध महाराष्ट्राने डोक्यावर घेतले. वीर वामनराव जोशींचे नाव घेतले तरी आज महाराष्ट्र नतमस्तक होतो. वामन मल्हार जोशींचा 'सुशीलेचा देव' व 'इंदू काळे सरला भोळे' या कादंबऱ्या आज मराठी साहित्यात दृढ स्थानावर आहेत.'[१]

स्वातंत्र्योत्तर साठपूर्व कालखंडातील विविध प्रकारच्या कादंबऱ्यांमध्ये ना.रा. शेंडे, भाऊ मांडवकर, ग. त्र्यं. मांडखोलकर, पु.भा. भावे, पु.य. देशपांडे, वरखेडकर, मुक्तिबोध, उद्धव शेळके, दिनकर देशपांडे, महाजन, भोळे, टोंगो अशा अनेक नामवंतांनी कादंबरीलेखन केले आहे. यामध्ये सामाजिक जाणिवा व्यक्त करणाऱ्या कादंबऱ्यांचा भरणा अधिक आहे.

## विषय विवेचन

स्वातंत्र्योत्तर साठपूर्व कालखंडातील कादंबऱ्यांनी करमणुकीवर अधिक जोर दिला असला तरी त्यातूनही सामाजिक आशयप्रधान कादंबऱ्या दुर्लक्षून चालत नाही. वि.ल. भावे, ना.रा. शेंडे आणि डॉ. भाऊ

मांडवकरांसारख्या कादंबरीकारांनी सामाजिक कादंबऱ्यांची उल्लेखनीय निर्मिती केली. समाजातील विविध समस्यांना वाचा फोडताना त्यांनी समाजाचे ज्ञात—अज्ञात कोपरे धुंडाळून वस्तुनिष्ठ संशोधन करून साहित्यनिर्मिती केल्याचे निदर्शनास येते. प्रत्येक साहित्यिकाच्या आविष्कारांचे स्वरूप भिन्न आहे. अगदी घनदाट अरण्यांमध्ये जगापासून दूर वास्तव्य करणाऱ्या आदिम जमातींपासून तर अनाथालयात वाढणाऱ्या समाजघटकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम या कादंबऱ्यांनी केले.

ना.रा. शेंडे यांनी ग्रामीण जीवनावर आधारित असलेली 'काजळी रात्र' ही कादंबरी लिहिली. या कादंबरीतील कथानकाचा कालखंड १९४२ ते १९४७ असा आहे. अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाचे भेसूर चित्र लेखकापुढे तरळत असावे आणि त्यातूनच या कादंबरीचा जन्म झाला. माणसांमधील विषमता नष्ट होऊन समता प्रस्थापित व्हावी, जातिभेद नष्ट व्हावा, दारिद्र्यात होरपळणाऱ्या तळागाळातील लोकांची उन्नती व्हावी अशा विचारांतून ही निर्मिती झाली. ब्राम्हण, ब्राम्हणेतर आणि दलितांनी एकत्र येऊन भावनिक एकता निर्माण व्हावी, ही इच्छा या कादंबरी लिहिण्यामागची आहे, हे जाणवते. या कादंबरीत मोहन गडकरी हे अस्पृश्य पात्र, चित्रा सरंजामे ब्राम्हणवर्गीय, सरू हे ब्राम्हणेतर पात्र आणि मिस आर्कनी ख्रिस्ती अशा विभिन्न जातीपंथाची पात्रे आणि त्याबरोबरच समाजोन्नतीसाठी कराव्या लागणाऱ्या कार्याची दिशा लेखकाने दाखवून दिली आहे. श्रीमंतांना लुटून गरिबांना मदत करणारे शेष महाराज, अस्पृश्यता नष्ट होऊन ब्राम्हण, महार एक व्हावेत अशी इच्छा बाळगणारी चित्रा सरंजामे, समाजोन्नतीसाठी झटणारे, स्वत:ची विहीर आणि देऊळ अस्पृश्यांसाठी खुले करणारे दयाळबाबा, दु:खीकष्टी लोकांचे जीवन फुलवून समतेसाठी प्राणपणाने झुंज देणारा अज्ञात इसम अशी ही पात्रे आणि प्रसंग लेखकाने चित्रित केली आहेत. तसेच चित्रा अणि मोहन यांच्या प्रेमातून लेखकाने समाजातील बदलाची दिशाही सूचित केली आहे.

अशीच सामाजिक दृष्टी ना.रा. शेंडे यांच्या 'तांबडा दगड' या कादंबरीतही आहे. ही कादंबरी आदिवासींच्या जीवनावर आधारित आहे. दलितोद्धार आणि भारताच्या प्राचीन संस्कृतीचे वारसदार असलेल्या आदिवासींचा विकास हाच विषय या कादंबरीचा आहे. ही एक वास्तवदर्शी कलाकृती आहे. त्यातून पळसवनातील दोन गावांच्या सुधारणेसाठी काही निस्वार्थी कार्यकर्त्यांनी केलेले प्रयत्न, परिणामी द्वेषबुद्धी नाहीशी होऊन समाजसुधारणेचा पाया घातला जाणे असे मनोज्ञ दर्शन या कादंबरीतून होते. शहरापासून दूर अशा अरण्यात राहणाऱ्या आदिवासींना विश्वासात घेत त्यांच्या कलेने वागून त्यांना मुख्य प्रवाहात आणताना सुधारणाभिमुख करता येते, याची प्रचिती या कथानकात येते. त्यांच्या अंधश्रद्धा, चुकीच्या चालीरीती, अज्ञान नाहीसे करून त्यांना स्वत:च्या स्थितीसंबंधी विचारप्रवृत्त करणे हे काम कादंबरीतील रायभान, धोंडबा ही पात्रे करतात. 'तांबडा दगड' हा मुळातच लालसा, दुष्ट भावना आणि आसुरी वृत्तीचा प्रतीक आहे. तांबड्या दगडाच्या ठिकऱ्या उडवून त्याच ठिकाणी आदिवासींच्या सेवेसाठी शुश्रूषागृह उघडले जाते. आदिवासी सेवा संघाची एक भव्य इमारत निर्माण होऊन दोन्ही गावांचा विकास साधला जातो. योग्य मार्गदर्शन मिळाले तर परिवर्तन घडते असा संदेश लेखक देतात.

डॉ. भाऊ मांडवकरांनी 'माझी चाळीस भावंडं' या आपल्या पहिल्याच कादंबरीतून समाजाच्या सहानुभूतीला पारखे झालेल्या उपेक्षितांचे दु:ख मांडले आहे. समाजाचा दंभस्फोट करणारी कादंबरी म्हणून ती ओळखली जाते. अनाथांच्या जीवनाला आणि त्यांच्या अनाकलनीय अंतरंगाला प्रकट करणारी ही कादंबरी. वास्तव वर्णनात रमलेली आणि अनाथालयांमधील भ्रष्ट यंत्रणा वर्णन करताना लेखकाच्या लेखणीची ताकद येथे जाणवते. 'माझी चाळीस भावंडं' ही कलाकृती अनन्यसाधारण आहे. अनुभूतीच्या भक्कम खडकावर ही वास्तवपूर्ण कथा उभी आहे. ही कादंबरी लिहिण्यापूर्वी लेखकाने अनेक आश्रम फार जवळून पाहिले आहेत. त्या आश्रमातील अनाथांशी त्यांचा घनिष्ट परिचय आहे. त्यांची सुखदु:खे त्याने ऐकली आहेत, उघड्या डोळ्यांनी पाहिली आहेत. 'लेखकाने या कादंबरीतील काही व्यक्ती समाजात पाहिलेल्या आहेत. त्यांच्या वृत्तीचे सूक्ष्म अध्ययन करून त्योन त्याला कलेचा साज चढवला आहे.'[२]

अनाथांना विकणारी दुकाने असे रूप असणारी अनाथालये, तिथले गैरव्यवहार, समाजात प्रतिष्ठित म्हणून लौकिकप्राप्त व्यक्तींचे हिडीस आंतरिक जीवन या सगळ्यांचा जीवन आलेख या कादंबरीत आत्मनिवेदनपर प्रयोगाद्वारे मांडला आहे. समाजावर प्रचंड चिडलेली नायिका येथे वर्णन केली आहे. संधी मिळताच ती समाजावर व समाजकंटकांवर तुटून पडते. अनाथपण तिच्यावर लादले गेले आहे. तिच्या जीवनाचे सतत धिंडवडे निघतात आणि त्यामुळे तिचे संघर्षशील मन पेटून उठते. समाजातील तथाकथित प्रतिष्ठितांचे बुरखे फाडून त्यांचे वास्तव ती पुढे आणते. 'आश्रमातल्या मुली म्हणजे माळरानावरची माती. ती कुणीही उखरावी, कुणीही उधळावी, कुणीही

न्यावी, कुणीही तुडवावी! रानातील पाचोळा वारा आला की उडत जाणार! कुठंतरी पडणार! वाऱ्याच्या गतीबरोबरच पाचोळ्याचं भवितव्य ठरतं!'[३] असं हृदयविदारक वर्णन या कादंबरीत येतं.

पु.भा. भावे यांनी समाजातील विविध पातळीवरच्या वेगळ्या आणि हृदयभेदक प्रश्नांना आपल्या कादंबऱ्यांतून वाट मोकळी करून दिली. अकुलीनांच्या व्यथा, अपौरुषांच्या पत्नीची जीवघेणी कहाणी, तिची तडफड त्यांनी वर्णन केली. समाजात अगतिक झालेल्या व्यक्तींचा संघर्ष त्यांनी मांडला. समकालीन सामाजिक समस्या आणि पूर्वीपासून चालत आलेल्या सामाजिक समस्या या दोन्हींना समर्थपणे मांडण्यात भावे यशस्वी झाले आहेत. त्यांचे विषय नवे नव्हते; परंतु अनुभव घेण्याची आणि वाचकापर्यंत पोचविण्याची त्यांची संपन्न हातोटी वाचकांची मने सुन्न करून टाकणारी ठरली. १९५१ मधील 'अकुलीना' या कादंबरीसाठी त्यांनी वेश्याकन्येविषयी आत्मीयता हा विषय निवडला होता. पत्रपद्धतीचा वापर करून कथानायकाने आपली संपूर्ण कहाणी मित्राला कळविली, ही पद्धत किंवा रचना या कादंबरीची आहे. ल.ग. जोग यांच्या मते, ' 'अकुलिना' हा वाचकाला अमर्याद अस्वस्थ करून सोडणारा अनुभव आहे. ही दुसरी मनोवस्था प्रभावी होत जाते त्यामुळ कादंबरीचा दर्जा एकदम उंचावतो......एखाद्या नायकाने वा वक्त्याने आपल्या कलेची कमाल उंची गाठून एकदम थांबावे म्हणजे जसा अनुभव येतो, तसा येथेही येतो.'[४]

ग.त्र्यं. मांडखोलकरांच्या कादंबऱ्या राजकीय पटलावरील असल्या तरी त्यातही काही सामाजिक जाणिवा उमटलेल्या दिसतात. वैवाहिक समस्यांवरील विवेचन त्यांच्या 'अनघा'मध्ये आढळते. 'स्त्रीजीवनाची सफलता, प्रौढ विवाहातील नाजूक गुंतागुंती, विज्ञान आणि नवी नीती यांच्यामुळे पातिव्रत्याविषयीच्या कल्पनांमध्ये झालेले बदल, कुटुंबसंस्थेचा होत असलेला ऱ्हास'[५] या प्रश्नांचा विचार या कादंबरीत केलेला आहे. माडखोलकर पत्रकारही असल्यामुळे समाजातील सर्व थरातील जीवनाचे अवलोकन करण्याची संधी त्यांना मिळाली. परिणामी त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये समाजजाणिवांना महत्त्व दिलेले आहे.

कुठल्याही व्यक्तीची जडणघडण ही समाजातच होते. त्याच्या व्यक्तिमत्त्वाला समाज जबाबदार असतो. शरच्चंद्र मुक्तिबोधांची 'क्षिप्रा' ही कांदबरी याच कालखंडातील. एका कनिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंबाचा, स्वार्थी, लोभी, दांभिक जगात स्वत:च्या अस्तित्वाकरिता सुरू असलेला संघर्ष या कादंबरीत आहे. अनेक अभ्यासक या कादंबरीला व्यक्तिप्रधान कलाकृती मानतात. मात्र स्वत: लेखकाच्या मते, 'व्यक्तिमन ससंदर्भच आकळावे लागते. ते तसे आकळले गेले तरच त्याला अर्थ प्राप्त होऊ शकतो. मुळात व्यक्त म्हणजे काही सुप्त शक्तींचा एक पिंडच असतो व समाजात राहू लागल्यावर त्याला बरेवाईट व्यक्तित्व प्राप्त होत असते. समाजाबाहेत त्या व्यक्ती अव्यक्तच राहतात. तेव्हा व्यक्ती म्हणजे सामाजिक प्रक्रियांमधून आकाराला आलेले व्यक्तिमत्त्व असते.'[६] व्यक्ती आणि समाजाचे नाते उलगडवणारी ही कादंबरी.

वैदर्भीयच काय तर मराठी कादंबरीक्षेत्रात ज्यांचे नाव अपरिहार्यपणे व आदराने घ्यावे लागते त्या उद्धव शेळक्यांनी 'मागणी तसा पुरवठा' या न्यायाने अनेक कादंबऱ्या लिहिल्या. लिखाणात सातत्य टिकविणारे शेळके यांनी ग्रामीण, प्रादेशिक कादंबऱ्यांमधून निवडलेले विषय हे सामाजिकच होते. 'नांदते घर' ही त्यांची नागरजीवनावरील पहिली कादंबरी. अमरावती शहरातील मध्यमवर्गीय कुटुंबातील मोजक्या कालावधीमधील सुखदु:खाच्या चढउताराचा आलेख काढणारी ही कादंबरी. 'बाईविना बुवा' या कादंबरीत शेळके यांनी वेगळ्याच विषयाला हात घातला. बायकोने टाकून दिल्यावर स्त्री–समागमासाठी हपापलेल्या दुबळ्या नवऱ्याला योग्य मार्ग न सापडल्याने क्रमाक्रमाने त्याची होत जाणारी अध:पतित अवस्था लेखकाने अत्यंत संयमाने आणि ताकदीने चित्रित केली आहे. बायकोने टाकणे या अपमानास्पद भावनेने समाजात जगणाऱ्यांची मनोवस्था, त्यांना लुबाडणारा समाज आणि अशा व्यक्तींचे होणारे अध:पतन लेखकाने वर्णन केले आहे.

प्रादेशिक कादंबरी म्हणून गणल्या गेलेल्या शेळक्यांच्या 'धग'ने तर अनेक विक्रम मोडले. ग्रामीण भागातील एका जिद्दी आणि कर्तृत्ववान नायिकेच्या लढ्याची करुण कहाणी म्हणजे 'धग'. कामचुकार नवरा नशिबी आल्याने लेकराबाळांसाठी स्त्रीला किती कष्ट करावे लागतात, अनेक आघातांना तोड देत समाजात कसे जगावे लागते किंवा जगण्यासाठी कशी केविलवाणी धडपड करावी लागते याचे वर्णन येथे आहे. वैदर्भीय म्हणी, वाक्प्रचार आणि संवाद यांची रेलचेल असलेली ही सामाजिक विषयाला स्पर्श करणारी कादंबरी मराठी कादंबरीक्षेत्रात मानाचे पान मिळवून गेली.

दिनकर देशपांडे यांची 'तपझिरा' (१९६०), ना.के. महाजन यांच्या 'विनाश' भाग १ आणि भाग २ (१९४७–१९४८), 'चारुता' (१९५३), मा.ना. भोळे यांची 'दुनिया', श्रीकांत राय यांची 'वीस दिवस' (लघुकादंबरी) (१९५३) अशा काही कादंबऱ्यांमधून सामाजिक विषयांना हात घालण्यात आला आहे.

स्वातंत्र्योत्तर साठपूर्व या तपात वैदर्भीय कादंबऱ्या विपुल प्रमाणात आल्या. अनेकांचे विषय स्वातंत्र्य चळवळीच्या आणि घडून गेलेल्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर होते, हे मान्य करावे लागते. त्याच काळात समाजातील विविध समस्यांनी तोंड वर काढले होते. एकीकडे गांधीवाद, मार्क्सवाद आणि कौटुंबिक, सामाजिक जीवनावर होत गेलेले विविध प्रभाव आणि अशा अनेक समस्यांपासून दूर जाऊन रंजनवादाकडे वळलेल्या लेखण्या या सर्वांचा विचार करता अनेक कादंबऱ्यांमध्ये कमीअधिक प्रमाणात सामाजिक जाणिवा प्रगट होत गेल्या. त्या कादंबऱ्यांनी जे मराठी साहित्यविश्वाला दिले, त्याला तोड नाही. त्याच्या पुनर्अध्ययनाची गरज मात्र आहे.

## निष्कर्ष

१. इ.स. १९०० नंतर वैदर्भीय कादंबरीक्षेत्रात दिसू लागलेल्या आशावादी व चैतन्यमय चित्रात बा.सं. गडकरी यांनी १९०९ मध्ये 'सुधारणेचा मध्यकाल' ही सामाजिक कादंबरी लिहून खऱ्या अर्थाने वैदर्भीय मराठी कादंबरीची सुरुवात केली.

२. वि.ल. भावे, ना.रा. शेंडे आणि डॉ. भाऊ मांडवकरांसारख्या कादंबरीकारांनी सामाजिक कादंबऱ्यांची उल्लेखनीय निर्मिती केली.

३. समाजातील विविध समस्यांना वाचा फोडताना विविध कादंबरीकारांनी समाजाचे ज्ञात—अज्ञात कोपरे धुंडाळून वस्तुनिष्ठ संशोधन करून साहित्यनिर्मिती केली.

४. गांधीवाद, मार्क्सवादाचा प्रभाव पाडणारा काळ आणि कौटुंबिक, सामाजिक जीवनावर होत गेलेले आघात त्यामुळे समस्यांपासून दूर जाऊन रंजनवादाकडे वळलेल्या लेखण्यांनी सामाजिक जाणिवांना तितक्याच कसदारपणे सादर केलेला हा वैदर्भीय कादंबरीचा कालखंड आहे.

## संदर्भ

१. गडकरी, माधव, साहित्यातील हिरे आणि मोती, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८४, पृ. १०१—१०२

२. कळणावत, शरद, अभिप्राय, माझी चाळीस भावंडं, भाऊ मांडवकर, सेवा प्रकाशन, अमरावती, पाचवी आवृत्ती, २००९, पृ. १६७

३. मांडवकर भाऊ, माझी चाळीस भावंडं, सेवा प्रकाशन, अमरावती, पाचवी आवृत्ती, २००९, पृ. २३

४. जोग, ल.ग., कादंबरी, चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९६३, पृ. १४७—१४८

५. माडखोलकर, ग.त्र्यं., निवेदन, अनघा, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, प्रथमावृत्ती, १९५०

६. मुक्तिबोध, शरच्चंद्र, माझ्या कादंबरी लेखनाच्या प्रेरणा, प्रतिष्ठान, फेब्रु—मार्च—एप्रिल, १९६४, पृ. ३२

❖❖❖

# FACTORS ASSOCIATED WITH CHILD OBESIOTY AND EMERGING CONSEQENCE – A MATTER OF SERIOUS CONECERN

**Sau. Kalpana Korde**
Shivshakti Arts, Commerce Mahavidyalaya
Babhulgaon, Dist. Yavatmal

## Introduction

There is a rapidly escalating epidemic of obesity all over the world. In developing countries the epidemic attracts much attention, but there is little realization of similar and perhaps more serious epidemic in the developing countries, countries like, India have controlled the problem of severe under Nutrition to a substantial extent but are now facing a rising epidemic of obesity.

Obesity has reached epidemic proportion in India in the 21st century with morbid obesity affection 5 % of the country's population. India is following a trend of steadily becoming more obese.

Childhood obesity is a fast emerging problem in India. In children aged about 12-17 year old had more than doubled in decade. According to a report by International Association for the study of obesity 2009-10 over 155 million school age children are overweight. Overweight and obesity ate among the prevalent nutritional problems in developed and developing countries. The prevalence figures for overweight (8.5-29%) and obesity (1.5-7.4%) in India children are comparable with that for western Nations [(7.9-25.4%) for overweight and (0.9 to 7.9%) for obesity].

According to WHO, 22 million children under 5 year of age are overweight, WHO has also emphasized prevalence trend contributing factors and developing strategic for effective intervention Mishra etc al (2006) reported prevalence of childhood overweight and obesity as below-

| Country/City | Year | Prevalence |
|---|---|---|
| Global | 2004 | 10 |
| USA/UK | 2000 | 20 |
| Australia | 1995 | 20 |
| India/Chennai | 2002 | 22 |
| India/Delhi | 2004 | 16 |
| India/Delhi | 2006 | 29 |

Considering the gravity of situation and keeping these points in mind, an attempt has been made to present theoretical orientation without any research study planned and carried out in short period of time.

Obesity is a state in which there is a generalized accumulation of excess adipose tissues in the body leading to more than 20 percent of desirable weight.

According to Mahajan (2012) obesity means having too much body fat. Taking in more calories than you burn can lead to obesity because the body stores unused calories as fat.

Overweight on the other hand is a condition where the body weight is 10-20% greater than mean standard weight for age, height and sex. Usually obesity is due to positive energy balance.

Obesity is an excess proportion of total body fat, the best indicator of fatness is 'Body Mass Index' or BMI. It is therefore necessary to keep BMI below the prescribed limits according to age.

## Factor Associated

As stated above obesity is complex multi-factorial chronic public health and policy problem. It has been established that factors listed below are closely associated with the problem of obesity.

I) Changing pattern of food intake both in terms of quality and quantity.
II) Urbanization
III) Socio-economic factors
IV) Genetic factor
V) Physical Activity Pattern
VI) Gender
VII) Life style factors
VIII) Parental Obesity

## I) Changing pattern of food intake both in term of quality and quantity

Sikandra and Punia (2010) noticed that 64 percent of obese respondents and 84 percent of non-obese group respondents were vegetarian. Twelve percent non-obese responded and 21 percent obese respondents were ovatarian.

Ramchandran (2004) reported that majority of obese respondents ate non-vegetarian items compared were ovatarian.

Goran (2001) observed that fast food Noodle, Snacks, Pastries, Ice cream and Chocolate significantly increase the prevalence of overweight and obesity was higher among children who consumed fatty and fried foods and also among these frequently consuming shaker, ice creams. Etc.

Amin et al (2008) reported that frequency of eating food outside home was high among overweight and obese children and that was five times per week or more.

Gills and Bar (2005) observed that obese children consumed significantly more fast food than the non-obese children and that contribute a significance amount of extra calories and fat in their diet. He further noticed that 12 percent of the obese respondents were taking soft drinks daily.

In addition to the nutritional transitions, the behavioral transitions of children is also possibly contributing significantly to the rapidly rising prevalence of obesity

Unhealthy eating habits like,

- Erratic eating habit
- Frequent fast and fried food consumption
- Excess intake of colas.
- Excess consumption of refined food
- Not consuming enough fruits and vegetables and
- More than 40 % of the children eat out once or more in a week
- 70 % children eat chips once or more in a week
- 48 % children eat pizza once or more in a week
- 40 % children eat French fries once or more in a week
- 60 % children eat Noodles once or more in a week are major curprits.

( Misra et. Al. 2011 unpublished date)

- Reality is-

Parents do not realize, but children are eating junk food all the time

## II) Urbanization

The strongest risk factor for obesity is urbanization. Obesity is least three times mor common in cities than in villages, although it is increasing rapidly, even in villages because traditional villages are also becoming urbanized in their habits.

Studies on urban Indian school children from selected regions report a high prevalence of overweight and obesity Raj et at, Noticed a significantly higher proportion of children from urban schools were obese compared with rural schools both in 2003 and 2005.

Obesity epidemic is assuring series proportions in cities and affecting young, adults and children.

Obesity has reached alarming figures, Currents figures in New Delhi indicate that every second person fulfills criteria of obesity or has excess abdominal fat.

Rising childhood obesity in urban India and in other developing countries is of great concern and would fuel the diabetes and the metabolic syndrome epidemics further overall, it is more in urban areas as compared to rural, and public schools.

## III) Socio-economic factors

Rapid economic growth has improved the nutritional socio-economic and health status of many countries, which has contributed to development of overweight and obesity to considerable extent.

## IV) Genetic Factors

It is still unclear what role genetic factors play in the obesity.

## V) Physical Activity pattern

Sikandra and Darshan (2012) in their study observed playing of game was the main activity of non-obese group children (42%) followed by cycling (30%) and walking (18%),However, obese children were least interested in playing of games, only 7.5% obese children doing walking. Majority of obese children (73%) were not doing any physical activity which weight have contributed towards their obesity

Kapil et al (2002) found that only 19% of school children were engaged in outdoor activities and 90% obese children were not engaged in outdoor activity at all.

Thompson et al (2005) observed positive co-relation between lack of physical exercise and obesity. None of these children spent more than 60 minutes for physical activity. Physically inactive leaves unused energy in the body, most of which is stored as fat.

Researches discover that carbohydrate over feeding produced 75-85% excess energy as body fat.

Mishra et al. (2011) reported that lack of physical activity contribute to obesity stating that 67% of obese children spend less than one hour in physical activity.

## VI) Gender

When we turn to gender difference, we find that the effect is substantially larger for female students than for male students. This greater difference is particularly large for fixed effects model in the lower panel.

Ramchandran (2002) reported prevalence of overweight to the extent at 17.8% for boys and 15.8% for girls, however Kumar (2007) observed of obesity was more in girls (8.82%) than boys (4.10%) in school going students if 10-15 years of age. Similar observations were recover by Agarwal, K.N. et al. (2001)

## VII) Life Style Factors

Life styles changes are likely to have a greater impact on children from offluent back ground sedentary life style of children have been attributed mainly to Television viewing, computer games, internet over emphasis on academy excellence, unscientific urban planning.

Grundy (2006) reported that obesity occurred in children, frequently spending their late afternoons in watching T.V. and snacking. Television, computer and video games contribute to children’s inactive life styles.

## VIII) Parental Obesity

Some studies on obesity demonstrate the importance of parental obesity in prediction children’s risk of obesity in adult hood. Several studies now indicate that obesity in young adults life is associated with increased morbidity and mortality.

## Consequence

Obesity is major health threat. The extra weight puts added stress n every part of our body. People with obesity are at risk for following health problems. (Mahajan, Prachi, 2012)

1. Bone and joint problems-extra weight puts strain on the bones and joints. This can lead to osteoarthritis, a disease that causes joint pain and stiffness.
2. Gallstones and liver problem
3. Heart attack from coronary heart disease, congestive heart failure and stroke.
4. High blood cholesterol and triglycerides ( Dislipideamia or high blood fats)
5. High blood pressures (Hypertension)
6. High blood sugar (Glucose) or diabetes.
7. Stopping breathing during sleep (Sleep apnea) which can cause daytime fatigue or sleepness, poor attention and problems at work. Obesity is complex multi-factorial chronic public health and policy problem because of it prevalence, costs and health effects.
8. Obesity in children appears to increase the risk of subsequent morbidility, whether or not obesity persists into adult hood.
9. Obesity is evolving as a major nutritional problem in developing countries, affecting substantial number of adults and resulting in an increased burden of chronic disease.
10. Outcomes related to childhood obesity include hypertension (Prevalence of incident hypertension in normal weight, overweight and obese groups was 10.1, 17.34 and 18.32 respectively) type 2 diabetes mellitus, dislipideamia, left ventricular hypertrophy, Non-alcoholic steatohepatitis, obstructive sleep apnea and orthopedic and psycho-social problems.
11. Insulin resistance, pcos, hirsutism, sub clinical inflammantion and hepatic steatosis are now frequently seen in children.
12. Excessive weight during adolescence predicts a number of average effects on health later in life including increased mortality in men.
13. Hardening and blockage of the arteries starts at 11 years in boys and 15 years in girls.
14. Manu Raj et al, 2007 examined the time trends in childhood obesity in a representative sample of school children and determine the relationship of obesity with blood pressure.
15. Complications of obesity-

i) Pulmonary disease-abnormal function, obstructive sleep apneam hypoventilation syndrome
ii) Idiopathic intracranial- hypertension, stroke
iii) Nonalcoholic fatty liver disease, steatpsos, steatohepatitis, cirrhosis.
iv) Cataract- Coronary heart disease, diabetes, dyslipidemia, hypertension
v) Serve pancreatitis-
vi) Cancer breast, uterus, cervix, colon, esophagus, pancreas, kidney, prostate
vii) Gall bladder disease - Gynecologic abnormalities, abnormal menses, infertility, polycystic ovarian syndrome
viii) Osteoarthritis, Skin, Gout, Phlebitis venous stasis

## Implications

1) Results of researches on obesity suggest the need for greater public awareness and prevention programs on childhood obesity and hypertension because childhood overweight and obesity are global programs that are on rise.
2) Effective prevention of adults obesity will requires the prevention and management of childhood obesity
3) It provides an excellent opportunity for prevention of cardiovascular disease by means of life style intervention targeted at childhood and adolescent populations.
4) Country wide programs akin to programs of “MARG” in school children are urgently needed.
5) According to food guide pyramid- pordax

i) Cereals (Six Serving)
ii) Pulses (Two Serving)
iii) Fruits (Two Serving)
iv) Vegetables ( Three Serving)

v) Dairy Products (Two- Three Serving)
vi) Meat And Meat products ( One – Two Serving)
vii) Sweets (sparingly) fat ( less than three tsp/day)

Interventions for overweight and obesity suggested by Mishra al (2006) entitled below

- Weekly individual counseling of children
- Lectures
- Activities, Skits, quiz competitions, extempore, focused group discussion.
- Replacing unhealthy food in canteen with healthy alternative
- Health camp for parents and teaches
- Recipe demonstration for healthy Tiffin.
- Skit demonstration by the intervention group in morning assembly on important days like the World Food Day
- Quiz competition in class
- Paragraph writing on topics like Ways in which you can prevent yourself from diabetes and heart disease in the next 5-8 years, healthy alternative to junk food, planning a day's diet for themselves planning their own Tiffin's for a week
- Checking Tiffin of younger classes in their school by the invention group.

## REFERENCE

1. Janssen, l,cralg W.M.Boyce, W.F. and pickett, W. Comparison of overweight aned obesity prevalence in school- aged youth from 34 countries and their relationships with physical activity and dietary pattern, Obes, Rev, 2005,6,123-13.
2. Wang. Y. Monteiro, C. and popkin, B.M. Trends of obesity and underweight in older children and adolescents in the united state, Brazil, China and Russia. Am.
3. Styen, D.M. The physiology of puberty, in clinical pediatric Endocrinology, Third Edition, B.O Brook (ED) Blackwell Scientific Publication Ltd. Oxford, 2001, 140-164
4. Nadgonda, D.V.G. Obesity prevalence, efiology and management, Nutr. Foun. Ind. 1997

❖❖❖

# घन कचऱ्याचे व्यवस्थापन एक समस्या : घाटंजी शहर अभ्यास

प्रा. कविता आर. किर्दक
गिलाणी महाविद्यालय, घाटंजी, जि. यवतमाळ

## प्रस्तावना

आजच्या परिस्थितीमधे लोकसंखेचा विचार केला तर लोकसंखेचा विस्फोटच झाल्याचे आपल्याला दिसते. आणि दिवसेंदिवस लोकसंख्या वाढतच आहे. आज मोठ्या प्रमाणात खेडे गावातील लोक रोजगारामुळे, व्यवसायामुळे इ. अनेक कारणामुळे शहराकडे येत असल्याचे आपल्याला दिसते आणि त्यामुळेच वाढत्या शहरीकरणात कचऱ्याची समस्या व त्याचे व्यवस्थापन करणे कठीणच होत आहे, त्यामुळे प्रदूषणही वाढत आहे.

वाढत्या प्रदूषणामुळे रोगजंतूचा प्रभाव वाढतो आणि रोगराई पसरते, दुर्गंधी निर्माण होते आणि या सर्वांचा परिणाम मानवी जिवनावर होतो. कचऱ्याचे दोन प्रकारे वर्गीकरण केल्या जाते. ओला कचरा, आणि कोरडा कचरा परंतु आपण त्याचे वर्गीकरण न करताच सर्व कचरा एकत्र टाकतो. त्यामधे घरातील कचरा उदाः भाज्यांची देठे, फुलांच्या साली, शिळे, उरलेले अन्न, शेतातील पालापाचोळा, दवाखान्यातील टाकाऊ पदार्थ, प्लास्टीकच्या पिशव्या, बॉटल्स, प्राण्यांचे मलमुत्र, रद्दी कागद इत्यादी अनेक प्रकारचा कचरा निर्माण होत असतो. सजीवांच्या जैव प्रक्रियेतून व त्याज्य पदार्थ निर्माण होतात त्याला कचरा म्हणतात. कचऱ्याच्या व्यवस्थापनाचा प्रश्न शहरी भागामध्ये जास्त येतो; कारण वाढत्या लोकसंख्येमुळे जास्त कचरा निर्माण होतो. आणि औद्योगीकरणामुळे सुद्धा मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो. निर्माण होणारा कचरा योग्य प्रमाणात मार्गी न लावल्या गेल्यामुळेच कचरा व्यवस्थापनाची समस्या निर्माण होते.

प्रदूषण हे अनेक प्रकारचे आहे. उदाः हवा प्रदूषण, भू–प्रदूषण, ध्वनी प्रदूषण इत्यादी आणि आज यामधे आणखी भर पडलेली आहे. ती म्हणजे कचरा प्रदूषणाची, कचरा प्रदूषणामुळे अवा प्रदूषण घडून येते. आणि याचे विपरीत परिणाम मानवावर होतात. जसजसा शहराचा विकास होत आहे. तस तसे कचऱ्याचे ढीगही वाढत आहेत.

## विषयाचे महत्त्व

आपल्या दैनंदिनीमध्ये उरलेल्या निरूपयोगी वस्तू, भाजी मंडई, दुकाने, कारखाने, दवाखाने, शेती, बांधकाम, या सर्व ठिकाणी अनेक प्रकारचा कचरा निर्माण होत असतो. आज कोणत्याही शहरात प्रवेश करीत असतांना सर्वप्रथम आपल्याला कचऱ्याचे ढीग दिसतात. वर्गीकरण न करता, कुठलीही प्रक्रिया न करता अशा प्रकारे टाकलेला कचरा हा सर्वच दृष्टीने हानीकारक असतो.

आज प्लास्टीकचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. तसेच लोकांचे राहणीमानही उंचावलेले आहे. आज सगळ्यांना लक्झरी लाईफ पाहिजे आहे. त्यामुळे आवश्यकता नसतानाही अनेक वस्तू खरेदी केल्या जातात. त्यामुळे आवश्यकता नसतानाही अनेक वस्तू खरेदी केल्या जातात. त्यामुळेही कचऱ्यामध्ये भर पडत आहे. तसेच वाढती लोकसंख्या, शहरीकरण, औद्योगीकरण इत्यादी अनेक कारणामुळे कचऱ्याची समस्या निर्माण होत आहे. आपल्या शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करून तो पुन्हा उपयोगात आणला जाऊ शकतो. परंतु अजूनही आपल्याला त्याचे गांभीर्य नाही. त्यासाठी लोकजागृती करणे आवश्यक आहे.

वर्गीकरण न केलेला कचरा जेव्हा शहराबाहेर उघड्यावर फेकला जातो तेव्हा त्यामुळे आजूबाजूचा परिसर गलिच्छ होतो. कचरा कुजल्यामुळे दुर्गंधी सुटते. व अनेक रोगांचा प्रसार होतो. कचऱ्याची विल्हेवाट लावायची सर्वात सोपी व स्वस्त पद्धत म्हणजे तो जमिनीत खोलवर पुरविणे किंवा ओसाड जागेवर जाळणे पण त्यामुळे पर्यावरणावर परिणाम होतो. हवा, भूजल आणि माती दुषित होते. दिवसेंदिवस वाढत जाणारा कचरा त्यामुळे होणारे दुष्परिणाम बघता कचऱ्याच्या समस्येकडे गांभीर्याने बघणे गरजेचे आहे. कारण या समस्येला आपण नागरिकच जबाबदार आहोत. आपली जीवनशैली आज बदललेली आहे, त्यामुळे अनेक वस्तू उपभोगण्याची पद्धतच कचऱ्याचे प्रमाण वाढण्यास कारणीभूत आहे. आज प्रतीव्यक्ती प्रतीदिन कचरा निर्माण होण्याचे प्रमाण अधिक झपाट्याने वाढत आहे.

## घनकचरा समस्या

घनकचऱ्याचे व्यवस्थापन ही जागतिक समस्या आहे. आज जगातल्या महत्त्वाच्या देशामध्ये घनकचरा निर्मितीचे प्रमाण पुढीलप्रमाणे दर्शविलेले आहे –

| जगातील प्रमुख देश | घनकचरा प्रमाण (किलोग्रॅम) |
|---|---|
| आईसलॅन्ड | १.९९ |
| नेदरलॅड | १.६७ |
| फ्रान्स | १.४५ |
| जपान | १.१३ |
| कॅनडा | ०.९५ |
| मॅक्सीको | ०.८६ |
| युनायटेड स्टेटस | २.०४ |
| युनायअेड किंगडम | १.५८ |

भारतातील महत्त्वाच्या राज्यामध्ये घनकचरा निर्मितीचे प्रमाण

| घनकचरा प्रतीदिवस प्रमाणे मेगॅटन | भारतातील प्रमुख राज्य |
|---|---|
| २६.८२० | महाराष्ट्र |
| १९.१८० | उत्तरप्रदेश |
| १४.५३२ | तामीळनाडू |
| ११.५०० | आंध्रप्रदेश |
| ९२.२७ | गुजराथ |
| ८७.८४ | कर्नाटक |

दिवसेंदिवस वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे कचऱ्याचे प्रमाणही वाढलेले आहे आणि त्यामुळे कचऱ्याची विल्हेवाट लावणे हा मोठा प्रश्न आहे. परंतु त्यावर कचऱ्याचे पुनश्च:क्रिकरण हा एक पर्याय होऊ शकतो, त्यासाठी गरज आहे ती जनजागृतीची.

महाराष्ट्र राज्य हा भारतातील सर्वात जास्त घनकचरा निर्माण एका दिवसाला महाराष्ट्र राज्यात २६.८२० मेगॅटन घनकचरा निर्मान होतो उत्तरप्रदेश १९.१८० मेगॅटन आणि तामिळनाडू १४.५३२ मेगॅटन घनकचरा या राज्यांमध्ये एका दिवसाला निर्माण होतो, या आकडेवारीवरुन दिसून येते की, या भारतामध्ये घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न गंभार आहेच पण भारतातील महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त घनकचरा निर्माण होतो. त्यामुळे महाराष्ट्राच्या दृष्टीने हा प्रश्न अतिशय गंभीर आहे.

## घाटंजी शहर आणि घनकचरा

घाटंजी शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता घनकचऱ्याचे व्यवस्थापण करणे ही मोठी समस्या झाली आहे. घाटंजी शहरामध्ये मानोली रोड, पांढुर्णा रोड, साखरा रोड, यवतमाळ रोड अशा अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसतात. त्यामुळे घाटंजी नगर परिषदेने घनकचऱ्याचे विल्हेवाट आणि पुनश्च:क्रिकरण प्रक्रिया करणे आवश्यक आहे. त्यामध्ये कंपोस्ट खत, आरडीएफ बायोडिजल, विजनिर्मिती, गांडूळखत, बायोगॅस, मेकॅनिकल कंपोस्ट इत्यादी तयार करणे आवश्यक आहे. त्यामुळे कचऱ्याची योग्यप्रकारे विल्हेवाट लावली जाईल व येथे राहणाऱ्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार नाही.

## सारांश

संशोधकाने 'घनकचऱ्याचे व्यवस्थापन एक समस्या : घाटंजी शहर अभ्यास' हा विषय संशोधनासाठी घेतला. घनकचऱ्याचे विपरीत परिणाम, मानववार व पर्यावरणावर होत असतात. पर्यावरण हा आजच्या आधुनिक युगातील ज्वलंत विषय आहे. पर्यावरणाचे रक्षण केले तरच मनुष्य व इतर प्राण्यांचे/पक्षांचे भवितव्य या पृथ्वीवर समाधानी व आरोग्यपूर्ण व सुखदायक होईल. म्हणून संशोधकाने पर्यावरण संकल्पना, पर्यावरणीय प्रदूषण, भूप्रदूषण आणि भूप्रदूषणामध्ये कचरा प्रदूषण दूर करायचे असेल तर घनकचऱ्याचे व्यवस्थापन योग्य रीतीने झाले पाहिजे त्यासाठी घनकचऱ्याचा पूर्ण वापर घनकचऱ्याचे पुनश्चक्रिकरण केले गेले पाहिजे.

## संदर्भ ग्रंथ सूची

गृहव्यवस्थापन :– त्रिवेणी फरकाडे, सुलभा गोंगे

कौटुंबिक संसाधनाचे व्यवस्थापन :– डॉ. मीना काळेले आणि गृहसजाटे

❖❖❖

## Form IV

(See Rule 8)

Statement about ownership and other particular about the Journal

## Research Journal of India

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | Dr. Bhau Mandavkar Research Centre, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | Annual |
| 3. Printer's Name | - | Seva Prakashan, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | Dr. Mrs. Veera Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | Dr. Pavan Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.



Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

## INDIRA MAHAVIDYALAYA

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401

☎ 07201-226170, 226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

e mail for Govt. & General : imvkalamb@yahoo.co.in

For University : indiram414@sgbau.ac.in

For Research centre : marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC ACCREDITED WITH 'B' GRADE

Multi-Faculty College Estd. in 1983



| | | | |
|---|---|---|---|
| Annual Subscription | - | Individual / Institutional / Single Issue | ₹ 500/- |
| Account Details : Bank | - | Bank of Maharashtra | |
| Branch | - | Azad Maidan Road, Yavatmal | |
| IFSC code | - | MAHB0000047 | |
| MICR coe | - | 445014001 | |
| A/c No. | - | 60175373000 | |
| Mode of Payment | - | By NEFT transfer or crossed Multi city cash at par Cheque or by Demand Draft of Nationalized Bank favorably Bank of Maharashtra payable at Yavatmal or by cash deposit in A/c in favour of Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre | |



(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)



ISSN 2349-9370

9 772349 937002